छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३५।
वर्ष १३ अंक ११
मूल्य रुपये पंधरा



ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

या माझ्या भारतदेशी

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावीं
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।। ध्रु. ।।

शेतात कोरड्या किसान गाळी घाम
पेरले उगवता हरखुन जाई भान
भरगच्च पिकाने पिवळे होई रान
बळिराजाची परि बाजारी धुळदाण
या भारतभूपुत्राच्या कष्टाला किंमत यावी ।। १ ।।

ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला
रखरखीत झाली ओलावा ओसरला
बोडके नागडे होता डोंगरमाथे
आटले झरे अन् सुकलेले पाणोठे
या सुकलेल्या रानात रुजवू या जीवनराई ।। २ ।।

गावात भांडती भाउबंद शेजारी
हे लोक निरक्षर कर्जाने आजारी
भाबडे भोळसट व्यसनांनी बेभान
मागास रिकामे शहरांचेच गुलाम
या गावकऱ्यांच्या गावी नवनवी उभारी यावी ।। ३ ।।

कान्ह्याच्या गावी भरले गोकुळ होते
गोपांच्या मेळी गोवर्धनबळ होते
कालिया पूतना कंस संपले सारे
यमुनेच्या काठी स्वातंत्र्याचे वारे
हरिकथा अवतरो हीच माझिया गावी ।। ४ ।।

– श्री. रामभाऊ डिंबळे

छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३५। वर्ष १३ अंक ११

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २५३ वा अंक, वर्ष २२ अंक १

प्रकाशन दिनांक – राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९३५/१ ऑगस्ट २०१३

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

२. **संवाद**	– महेन्द्र सेठिया
३. ललित... **मरिमायची कढाई**	– अशोक कोळी
६. कविता... **हिरवे गाणे खुडू नये...**	– आश्लेषा महाजन
पान...	– मुबारक शेख
७. माहितीपर... **भारतीय सैन्यदलात श्वानांचे योगदान**	– अरविंद भावे
९. स्वयंअध्ययन...**चित्रावरून निबंधलेखन...**	– शैलजा देशमुख – शिल्पा कुलकर्णी
११. कलाकृती ... **श्री गजाननासाठी मखर**	– मधुकर पालकर
१३. माहितीपर... **रुपयाची किंमत !!**	– डॉ. मुकुंद महाजन
१६. कथा... **भीम पराक्रम**	– विद्याधर म्हैसकर
१९. माहितीपर... **शोध कुणाचे... श्रेय कुणाला !**	– स्वानंद ऋषि
२१. निर्णयातील स्वावलंबन...७ **गटात निर्णय घेताना...**	– महेन्द्र सेठिया
२७. माहितीपर... **मंतरणारे शब्द !!**	– गणेश राऊत
२९. मुलांचे पान...**मी ट्रेकिंग सॅक बोलतेय !**	– चि. स्वराज पाटील
३२. **शिक्षकांच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'**	

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **या माझ्या भारतदेशी**– रामभाऊ डिंबळे

याशिवाय – जरूर करा (५), कल्पकतेला वाव (१०), सुंदर पताका (१२), करून तर पाहा (१५), अभिनंदन , मिळवा या प्रश्नांची उत्तरे (२४), बुद्धीला खुराक, श्रद्धांजली (२६), हसा हसा (३१)

- पानाखालील पावसावरच्या कवितेच्या ओळी कवी चंद्रकांत वानखेडे यांच्या आहेत.
- पानाखालील तळटिपेत धबधब्यांची माहिती दिली आहे.

मुखपृष्ठाविषयी – स्वातंत्र्यदिनाप्रित्यर्थ संरक्षण, शिक्षण, क्रीडा, अर्थविश्व तसेच ग्रामीण भागातील प्रगती वेगवेगळ्या प्रतीकांतून झेंड्याच्या पार्श्वभूमीवर दर्शविणारे हे मुखपृष्ठ आहे. हे मुखपृष्ठ करताना वॉटरप्रुफ ब्लॅक इंकचा वापर केला आहे व संगणकाच्या साहाय्याने त्यात रंग भरले आहेत. **– भरत केतकर**

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦

महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦

शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦

शैलजा देशमुख

नीलिमा करमरकर

डॉ. कांचनगंगा गंधे

आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ व आतील चित्रे ♦

भरत केतकर

♦ संपर्क पत्ता ♦

छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ

www.chhatraprabodhan.org

ई–मेल

chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी

वार्षिक: ₹ १८०/–
द्वैवार्षिक: ₹ ३४०/–
त्रैवार्षिक: ₹ ५००/–
दशवार्षिक: ₹ १,५००/–
या अंकाची किंमत : ₹ १५ /–
पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

असा पाऊस पाऊस, रस्त्यावर कोसळतो। सुट्टी शाळेला मिळेल, असे मना भासवतो।।

। जरूर पाहा... वजराज धबधबा - उंची १८४० फूट, कास फुलांचे पठाराजवळ (जि. सातारा) ।

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

संवाद

प्रिय देशभक्त प्रबोधकांनो,

नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होऊन एव्हाना २ महिने झाले. तुम्ही केलेल्या संकल्पांप्रमाणे किती गोष्टी पूर्ण झाल्या? (वर्षारंभी तुम्ही काही संकल्प केलेत, असं गृहीत आहे बरं का! नसतील केले तर लगेच करा.) संकल्प मोठे असतील तर त्या दिशेने काही पावले तरी पडली ना? संकल्प करणे जितके महत्त्वाचे तितकेच संकल्पांचा पाठपुरावा करणेही महत्त्वाचे आहे बरं का?

'१५ ऑगस्ट' हा आपल्या देशाचा स्वातंत्र्य दिन! यादिवशी राष्ट्रध्वजाला वंदन करताना, अनेकांच्या बलिदानातून आपल्याला स्वातंत्र्य मिळालंय, याची जाणीव आणि त्यांच्याप्रति कृतज्ञता आपण मनोमन व्यक्त करत असतो, हो ना! पण निव्वळ इतकं आता पुरेसं नाही. त्यांच्या बलिदानातून, त्यागातून, कर्तृत्वातून स्फूर्ती घेऊन, या देशाचं आजचं रूप पालटण्याचा वसा आपण घ्यायला हवा. त्यासाठी या देशावर मनापासून प्रेम आणि भक्ती करायलाही शिकायला हवं. तुम्ही म्हणाल, 'हे तर सगळेच सांगतात; पण म्हणजे या वयात आम्ही नेमकं काय करायचं?' साध्या, सोप्या गोष्टींपासून सुरुवात करूया.

या देशाचं गुणवर्णन, इतिहास-वर्तमान- भविष्याचं चित्रण ज्या-ज्या गाण्यांमध्ये केलं आहे अशी ५-१० गाणी मिळवून ती चालीसह पाठ करूया. त्यांचा अर्थ समजून घ्यायचा प्रयत्न करूया. आधी शब्दार्थ मग भावार्थ समजून घेऊया. मग त्याच्याशी निगडित घटना, प्रसंग, ठिकाणे यांची तपशीलात माहिती मिळवून वाचूया, ऐकूया, पाहूया. अगदी आपल्या राष्ट्रगीतापासून सुरुवात करा. अनेक वेळा तुम्ही छान छान चालीतली राष्ट्रभक्तिपर गाणी म्हणत असाल. आता त्यांचा अर्थ समजून घेऊन, ती पाठ करा. सतत गुणगुणत राहा. त्यातील इतिहासातील घटनांमधून आपण आज काय शिकू शकू, शिकायला हवं याचा विचार करून त्यानुसार स्वत:मध्ये बदल करायला सुरुवात करा. वर्तमानातील परिस्थितीचं वर्णन केलं असेल, तर त्यातील नेमके प्रश्न काय आहेत? त्याच्यामागची कारणे काय? हे समजून घ्यायचा प्रयत्न करा. पुढे जाऊन तुम्ही जे उच्च शिक्षण घ्याल त्यातून यातला कोणता प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही विशेष प्रयत्न करू शकाल? असा विचार सुरू करा. तुम्हाला जाणवलेल्या, अस्वस्थ करणाऱ्या प्रश्नाचा अभ्यास करा. प्रत्यक्ष परिस्थिती पाहून या. तो प्रश्न सोडविण्यासाठी ज्यांनी ज्यांनी प्रयत्न केले आहेत त्यांची माहिती मिळवा, त्यांच्या प्रकल्पांना भेट द्या. भविष्यातलं काही स्वप्नचित्र या गीतांमध्ये रंगवलं असेल, तर ते प्रत्यक्षात येण्यासाठी स्वत:मध्ये कोणकोणते गुण, क्षमता जाणीवपूर्वक मिळवाव्या लागतील असा विचार करून त्यासाठी प्रयत्न करा.

स्वातंत्र्यपूर्व काळात १२-१५ वर्षांचे विद्यार्थीही देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायचे. क्रांतिकारकांपासून समाजसुधारकांपर्यंत अनेकांच्या चरित्रांमध्ये तुम्हाला हे जाणवेल. त्यांनी शालेय वयातच देशाला प्रधान मानून त्यानुसार स्वत:च्या शिक्षणाची, दैनंदिन व्यवहारांची योजना केली. स्वत:मध्ये आवश्यक ते बदल केले. नवीन कौशल्ये, क्षमता संपादन केल्या; म्हणून मोठपणी ते समर्थपणे बलाढ्य अशा इंग्रजी सत्तेशी आणि समाजातल्या विघातक रूढी-परंपरांशी लढा देऊ शकले. आपल्यालाही मोठे होऊन हा देश सर्वार्थाने वैभवसंपन्न करायचा आहे ना! तर मग शालेय वयापासूनच हा भाव मनात रुजवायला आणि त्याप्रमाणे कृती करायला नको का? तोंडाने राष्ट्रभक्तिपर गाणी म्हणणार, प्रतिज्ञा म्हणणार आणि प्रत्यक्षात त्याप्रमाणे कृती करणार नाही; मग काय उपयोग?

मी शिस्त पाळेन, शब्द पाळेन, वेळ पाळेन, स्वच्छता पाळेन तेही स्वत:हून!मी कोणतेही काम उत्तमच करेन, त्यात वैज्ञानिक दृष्टिकोन असेल. त्यात नावीन्याचा आग्रह असेल. त्यात अनेकांच्या हिताची काळजी घेतली असेल. त्यात पर्यावरणीय विचार असेल. हे असं का करायचं? तर 'मी भारतीय आहे आणि भारतीय असण्याचा मला अभिमान आहे', हे त्यातून व्यक्त व्हावं म्हणून! शब्दांबरोबरच कृतीतूनही! यावर्षी १५ ऑगस्टच्या निमित्ताने हा विचार समजून घेऊया व त्याला कृतीचीही जोड देऊया.

खूप खूप शुभेच्छांसह अन् अपेक्षांसह...

सस्नेह तुमचा,

(महेन्द्र सेठिया)

असा पाऊस पाऊस, टप टप पत्र्यावर। कुणी पाखरू दिसेना, सारे गेले सुट्टीवर।।

। **जरूर पाहा... कुणे धबधबा -** उंची ६५९ फूट, लोणावळा-खंडाळा दरी (जि. पुणे)।

प्रायोजक - व्ही. व्ही. आर्किटेक्ट प्रा. लि., पुणे.

मरीमायची कढाई

– अशोक कोळी

सुखासमाधानाचं जीवन जगणाऱ्या तुमच्या-आमच्यासाठी सण म्हणजे उत्सव, आनंद!! पण अभावाचं जिणं जगणाऱ्या मुलांसाठी सणांचं अप्रूप काही वेगळंच. लेखकाने खान्देशी बोलीभाषेत हा लेख लिहिला आहे. पोळ्याच्या सणाच्या संदर्भात आपल्या लहानपणीच्या आठवणी लेखकाने जागवल्या आहेत. त्यातील कारुण्य वाचकाला नक्कीच अंतर्मुख करून जाईल.

जसा जसा सरावन मयन्हा सरत्याकडे जात व्हता तसतशा आमच्या आशा वाढीले लागत व्हत्या. आशा अशासाठी वाढीले लागत व्हत्या की, सरवणाच्या सरते पोया येत व्हता. पोया आमच्यासाठी लयलय महत्त्वाचा सण राहात व्हता...

पोया तं शेतकऱ्यांचा सण व्हता... आन् आमच्या घरीदारी तं काही शेतीवाडी, जमीनजुमला, बैलजोडी नव्हती; आसं आसल्यावर आमच्यासाठी पोया महत्त्वाचा कसा?

–त्येचं आसं व्हतं!

पोया जरी शेतकऱ्यांचा सण आसला, तरी शेतकरी काही गावात यखला राहात नव्हता. गावात त्येच्यासोबत कारू–नारू, आलुते–बलुते, फिरस्ते–मांगते आशे सम्दे घटक राहात व्हते. जे गावगाड्याचे अनभिन्न आंग व्हते, घटक व्हते.

शेतकरी त्येंचा पोशिंदा व्हता हे खरं व्हतं. म्हणून बी शेतकऱ्याच्या घरच्या सनाचा ह्या सम्दयायल्हे आनंद राहात व्हता. आनंद ह्यासाठी की आशा राहात व्हती...

आशा अशासाठी की,

गावगाड्यातले कारू–नारू आन् गाववाड्या भाईरचे स्पृश्य–अस्पृश्य आमच्यासारके, येंच्यासाठी पोया म्हन्जे दिवाईस राहात व्हता यक परकारचा! आम्ही जे शेतीकसे लव्हंडे मजूर व्हतो गावात, ते सम्दे शेतीवर अवलंबून व्हतो कुणब्याच्या. आन् आखाड सरावणात कुणबीकीचे कामं राहात नव्हते. म्हणून मंग गावकीच्या कामावरस आमची मदार राहात व्हती.

गावकीचे कामं निमूटानं करत व्हता, जो तो नेमून दिलेले. मांग तिन्हीसांजा शहाळा वाजवत व्हता. सालभर दवंडी आन् मवतीपुढी डफडं वाजवनं हे त्येचं काम व्हतं. बदल्यात त्येल्हे दरमयन्ह्याची आमोशा आन् पोयाच्या कढाईतला वाटा भेटत व्हता.

आमचे पूर्वज गावकीसाटी जागल्याचं काम करत व्हते. टपाल, कोतवालीचं काम करत व्हते. पाटलाच्या घरी पाणी भरत व्हते. बदल्यात आम्हाले मरीमायची कढाई भेटत व्हती. मरीमायची पूजा, तिल्हे साऱ्या गावाच्या वतीनं कढाई दाखवनं हे काम आमचं व्हतं. हे काम आमच्या घराण्यातल्या बाया करत आल्या व्हत्या वंशपरंपरेनं.

पोयाच्या सणाले शेतकरी–कुणब्याच्या बैलाची जशी वाजत गाजत पूजा व्हत व्हती, तशीच मरीमायची बी व्हत व्हती. एवढंच व्हतं, की मानाच्या बैलाची पूजा गावपाटलाच्या हातून व्हत व्हती आन् मरीमायची जागलीनच्या हातून! मरीमायची पूजा आमच्यासारक्या मांगते, जागल्यांसाटी मानाची, आशेची, वतनाची राहात व्हती.

आखाड–सरावण हा गावकीसाटी कसोटीचा काळ राहात व्हता. ह्यास काळात गावात रोगराई, महामारी पसरत व्हती. कोप होऊ नये म्हणून पोयाच्या दिशी मारोतीले नारय आन् मरीमायले कढाई देनी पडत व्हती. घराघरातून जात व्हती हे कढाई.

पोयाच्या दिशी माय मरीमायची मनोभावे पूजा करत व्हती. गावासाठी बी आन् आमच्यासाटी बी मरीमायची पूजा महत्त्वाची राहात व्हती.

रिमझिम पावसात, मन आनंदे नाचते। चिंब चिंब होवुनिया, गाणं पावसाचं गाते।।

। **जरूर पाहा... पांडवकडा धबधबा -** उंची ३५० फूट, खारघर, नवी मुंबईजवळ (जि. रायगड)।

प्रायोजक – कु. रेवती सारंग व्हाडपांडे, पुणे.



गावचा मांग पोयाच्या दिशी झापडीत चार वाजल्यापासून मरीमायपुढी डफडं वाजवत व्हता. डफड्याच्या आवाजानं सारं गाव जागं हून जात व्हतं त्येच्या.

तसं गाव मांजरझोपीतच राहात व्हतं त्यादिशी. काव्हा दिवस निघतो न् काव्हा नही, आसं हून जात व्हतं. जो तो चुयबुय करत राहात व्हता. डफड्याच्या आवाजानं झापडीत उठून जात व्हता. आंगतोंड धून आपापल्या कामाले लागून जात व्हता. कोन्ही मारोतीले नारय फोड्याले जात व्हता. कोन्ही खंडेराव, भवानीले! वावरातल्या वाडवडलांची पूजा! कोन्ही बैलांची तयारी कऱ्याले लागून जात व्हता.

घरधनीन बाया मातर घरातलं पाह्यात गरकं राहात व्हत्या. पोयाच्या दिशी तशे काम राहात व्हते त्येंच्या भवती. घराघरात गोडधोड सयपाक करना राहात व्हता. संद्याकाई बैलांची पूजा आन् पूरणोयीचा घास खावाडना राहात व्हता. म्होट्या पाहाटी मरीमायची कढाई देनी राहात व्हती.

मरीमायची कढाई देल्हयाशिवाय उमज पडत नव्हता घराघरात, सम्द्या गावात. त्याशिवाय घास खात येत नव्हता कोन्हाले आन् घरात नेमका खमंग बेत राहात व्हता. वडे, भजे, खीर, पापडी, दही, भात आसं सम्दं रहात व्हतं. दोन तीन मयन्ह्यापासून आसं खायाले भेटेल राहात नव्हतं. घरात काही राहात नव्हतं. शेतीवाडी, रानातले काम राहात व्हते. दिवस झडीपाण्याचे राहात व्हते. जीव मुठीत धरून जगनं पडत व्हतं..

आशा वक्ती कुठून भेटणार व्हते – वडे, भजे? वक्तावर मीठभाकर भेटत नव्हती. उपाशी राह्याचा परसंग येत व्हता. वखतस तसा बाका राहात व्हता. जिवाले नुस्ता वनवास राहात व्हता. आसा हा वनवास, उपास पोयाच्या दिशी सुटत व्हता. ढोराढाकरांपासून बायामान्सांलोंग... गावकामगारापासून शेतकरी, कुणबी, पाटलालोंग सम्हद्यायले गोडधोड खायाले भेटणार व्हतं. आट यखच व्हती, मरीमायले कढाई देल्हयावर.

पोयाच्या सणाले दायदाणा येत व्हता कुणब्याच्या घरात. उडीद, मुंग, चवळीचं करोटं पिकत व्हतं. करोट्याचं त्या गोडधोड शिजत व्हतं घराघरात...

घराघरातला घमघमाट नाकातोंडात पसरत व्हता. गरमागरम भजे, वड्यांवर ताव माऱ्यासाठी जो तो तरसत व्हता. पण मरीमायची कढाई देल्ह्याशिवाय खाता येणार नव्हतं कोन्हाले काही. म्हणून मंग जो तो आमच्या घराभवती फेऱ्या मारत व्हता. 'आमच्या घरची कढाई घेऊन जा आधी !', आसं सांगत व्हता.

आमच्या घरी भंबेरी उडत व्हती... कोन्हं काय काम कऱ्याचं काही समजत नव्हतं. माय त्या दिशी काव्हा उठत व्हती आम्हाले समजत नव्हतं. का रातभर जागीस राहात व्हती? आम्ही उठयाच्या आधी लगबग सुरू हून जात व्हती तिची. गावातल्या इतर कुटुंबासारकी सयपाकाची लगबग नव्हती राहात आमच्या घरी. मायनं राती दाय भिजू नव्हती घालेल राहात, ना सक्काळी तिल्हे वाट्याचा तरास व्हता राहात. वडे, भजे, खीर, पापड्या कशानं काही सयपाक करना राहात नव्हता तिल्हे.

आसं काहून? सम्द्या गावात वड्याभज्याच्या कढाया व्हत्या घरोघरी आन् आमच्यास घरी काहून नही? त्येचे दोन कारणं व्हते. एक म्हन्जे, घरात कशानं काही ठिकाना नव्हता राहात. आमच्या घरी काही शेतीवाडी नव्हती की करोटं पिकीन म्हणून. दुसरं म्हन्जे मायच्या हातून सम्द्या गावाच्या कढाया देन्या राहात व्हत्या. कढाया देन्या म्हन्जे; मरीमाय काही निवद खात नव्हती, ते नुस्ती वासाची भुकेली व्हती. पूजा करून निवद दाखवला, की माय सम्दी कढाई घरी घेऊन येत

असा पाऊस पाऊस, माझ्या अंगणी पडला। माझ्या अंगणात भासे, आज चांदण्यांचा सडा।।

। **जरूर पाहा... गारंबी धबधबा -** उंची १०० फूट, मुरुडजवळ (जि. रायगड)।

प्रायोजक – श्री. अजित भिडे (डायरेक्टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.) पुणे ☎ २५३८०४०६

व्हती. वडेच वडे आन् भजेच भजे व्हत व्हते आमच्या घरी.

आमच्या घरीच लगबग राहात व्हती. मायची बी आन आमची बी. माय कढाया वाहून न्याच्या लगबगीत राहात व्हती आन् आम्ही तोंडं वासून बसत व्हतो. भुकेचा आगडोंबस त्येवढा उसळलेला राहात व्हता पोटात.

कारण आखाड सरावनात माय बापले कामधंदा राहात नव्हता. एक एक दिवस कसा जात व्हता आमच्या आम्हाले ठाऊक व्हता. कशेतरी तग धरून राहात व्हतो. एकाच आशेवर जगत व्हतो; त्ये म्हन्जे पोया इन आन् आपले पांग फिटतीन. पोटभर खायाले भेटीन. चांगलं चुंगलं खायाले भेटीन. एवढीच आशा राहात व्हती...!

पोयाच्या दिशी, त्येच्या आधी कशानं काय अवस्था व्हत आशीन आमची? तुम्हाले सांगतो! डोयाले डोया लागत नव्हता. काव्हा उजडतो दिवस आन् काव्हा नही, आसं हून जात व्हतं.

पहाटीपासूनच माय कढाया वाह्याले लागून जात व्हती. पयल्हा मान गावपाटलाच्या घरच्या कढाईचा राहात व्हता. कोन्हं कित्ती बी घाई केल्ही, तरी पाटलाच्या घरची कढाई नेल्ह्याशिवाय त्येंचा नंबर लागत नव्हता.

अशानं आशी गावकऱ्यांची तकतक हू नही म्हणून माय झापडीत उठत व्हती. सम्दयात आधी पाटलाच्या घरची कढाई न्यून देत व्हती. त्येच्यानंतर एक एक करून समदया गावाच्या कढाया नेत हुती. यू जात हुती आन् यू येत हुती.

मरीमायचं मंदिर गावाच्या भाईर, नधीच्या काठावर व्हतं. तठी काट्याकुट्या आन् जंगल व्हतं. शिवाय रस्त्यात काटेकुटे आन् चिखलगारा व्हता. रस्ता नव्हताच राहात तठी जायाले. काट्याकुपाटीचे झुडपं वाढलेले राहात व्हते जागोजागी. झुडपं, गवत, काट्यातून मायले वाट काढनी पडत व्हती. चिखलगारा तुडवत मायबाईची भेट घेत व्हती माय.

तिच्याच पायात काही राहात नव्हतं. मायबाई बी आशी कसोटी पाहात व्हती तिची. पण माय आमच्यासाटी, गावासाटी हे सम्दं करत व्हती. काटेकुटे, चिखलगारा तुडवत व्हती. मायबाई पुढी माथा टेकवून 'इडापिडा टळू दे गावाची' आशी पारथना करत व्हती.

मायबाईची पूजा करून तिच्यापुढी ज्योत पेटवून, दिव्यात तेल टाकून, दहीभाताचं बोनं शिपडून; कढाईतल्या वडे, भजे, खीर, पापडीचा निवद दाखवून परसाद घरी घेऊन येत व्हती. तिच्यातला काही वाटा तठल्या तठी डफडं वाजवणाऱ्या मांगाच्या पधरात टाकत व्हती. बाकीचं आमच्यासाठी घरी घेऊन येत व्हती.

माय घरी योस्तर तिची आम्ही वाट पाहात व्हतो. अधीर हून जात व्हतो. भूक कंठालोंग दाटून येत व्हती. काही केल्ह्या दम मारात नव्हतं. वडे, भज्याचा घमघमाट सारका नाकातोंडातून शिरून राहात व्हता.

गाव पाटलाच्या घरची कढाई नेल्ह्यापासून आसं हून जात व्हतं. माय, घराच्या भाईर पडल्यापासून वाढून जात व्हती तगमग... काव्हा येते घरी न् काव्हा नि, आसं हून जात व्हतं. चिमणीच्या पिलांवानी चोचा वासून बसत व्हतो. पंखांची फड्फड् आन् वासलेल्या चोचा...

आसं राहात व्हतं...

माय बी काही उशीर करत नव्हती. रस्त्यातले काटेकुटे, चिखलगारा तुडवत झटदिशी येत व्हती. कशाची म्हणून नव्हती राहात परवा तिल्हे... पाठीशी तिच्या मायबाई राहात व्हती. आशी जात व्हती, आशी येत व्हती! कशानं काय आनंद व्हत आशीन बरं, माय घरी आल्यावर आम्हाले? काय सांगू, कसं सांगू तुम्हाले?

एक व्हत व्हतं, डोयांतून दोन्हींच्या घडाघडा धारा लागून जात व्हत्या. माय छातीशी कवटाळत चोचीत दाना टाकत व्हती. आमचं मन, पोट भरून पावत व्हतं.

❖ ❖

– अशोक कोळी
'कूड' गणपतीनगर सेक्टर-३ जळगाव रोड, जामनेर – ४२४२०६

जरूर करा - मित्रांनो, बोली भाषेतील हा लेख वाचताना तुम्हाला त्यातील काही शब्द अवघड वाटतील. त्यांचा अर्थ आपल्या अध्यापकांच्या मदतीने समजावून घ्या व त्यांचे प्रमाणभाषेतील समानार्थी शब्दांशी काय नाते आहे, ते शोधा.

चिंब चिंब पावसात, कसे भिजतात सारे । चहुकडे वाहतात, आज आनंदाचे वारे ।।

जरूर पाहा... लिंगमळा धबधबा - उंची ६२० फूट, महाबळेश्वर, वेण्णा दरी (जि. सातारा)।

प्रायोजक – श्री. चिंतामणी बने, डोंबिवली.

हिरवे गाणे खुडू नये

अंकुराला रुजू द्यावे, त्याचा बहर तोडू नये...
भूमीमधल्या मार्दवाचे हिरवे गाणे खुडू नये... ।।ध्रु. ।।
शेतामधल्या रुजवाईला
दिसामासी फुलवा येई
सुजलां सुफलां पृथ्वीभोवती
ऊन-वारा फिरकी घेई
भुकेल्याला भरवताना घास कमी पडू नये...
भूमीमधल्या मार्दवाचे हिरवे गाणे खुडू नये... ।।१ ।।
बळीराजा-अन्नदाता
कष्ट त्याचे, घाम त्याचा
अन्नब्रह्म निर्मितीचा
ध्यास मोठा चैतन्याचा
कृतज्ञाचे हात त्यांच्या हातांमधून सुटू नये...
भूमीमधल्या मार्दवाचे हिरवे गाणे खुडू नये... ।।२ ।।
राष्ट्र आपले, आपली माती
समाज आपला, विवेक दृष्टी
छोट्या मोठ्या उभारणीतून
एकसंघ अवघी सृष्टी
उन्नतीचा विशाल रथ, जगन्नाथाचा रुतू नये...
भूमीमधल्या मार्दवाचे हिरवे गाणे खुडू नये... ।।३ ।।

-आश्लेषा महाजन
'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर नं. १, पुणे ४११००९

पान

पान फांदीवर वाऱ्यासवे झुलते
दूर वनी, गीत सृजनाचे फुलते
थेंब मृगाचे, पान ओंजळीत झेलते
नक्षत्राच्या ऋणात झाड झंकारते
आपुल्याच नादात पानाचे जगणे
ऋतूंच्या हिशेबी विश्व सारे देखणे
देई मातीला हुंकार, पान पालवी
पाश मायेचे, कृष्णमेघास बोलवी
पानोपानी सौजन्य, सृष्टीचे झरले
ओल्या गंधाने उर, बिजांचे भरले...

- मुबारक शेख
१६२/८ ब, आळंदकर बंगला, रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१

कुठे लपू मी पावसा, मला अडोसा दिसेना। अन् तुझ्या थांबण्याचा, मला अंदाज लागेना।।

जरूर पाहा... ठोसेघर धबधबा - उंची ११५० फूट, चाळकेवाडी (जि. सातारा)।
दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा. **प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे.**

भारतीय सैन्य दलात श्वानांचे योगदान !

– अरविंद भावे

एकदा तरी आपण कुत्र्याचं गोंडस पिलू पाळावं ही इच्छा आपल्या सगळ्यांच्याच मनात लहानपणी दडलेली असते. कुत्र्यांची भावनांना प्रतिसाद देण्याची शक्ती हेच त्यामागचं महत्त्वाचं कारण ! अतिशय संवेदनशील असलेले हे प्राणी प्रशिक्षणानंतर गुन्हा अन्वेक्षणात, पोलिसदलात आणि सैन्यदलात खूप महत्त्वाचं काम करतात. भारतीय सैन्यदलात या श्वानांचं असलेलं योगदान खूप मोलाचं ! अतिशय रंजक अशा शब्दांत या श्वानपथकाच्या कामगिरीचा परिचय करून दिलाय सेवानिवृत्त कर्नल अरविंद भावे यांनी !

मनुष्येतर प्राण्यांमध्ये, अवतीभवतीच्या तसेच दूरवरच्या परिस्थितीत कुठल्याही प्रकारचा बारीकसादेखील बदल झाल्यास त्याचा परिणाम प्राण्याच्या शरीरावर होऊन, त्याचे संतुलन बिघडत असते. त्यामुळे ते प्राणी विशिष्ट हालचाली करू लागतात. म्हणजेच संभाव्य संकटाची प्राण्यांना 'मनुष्यप्राण्यां'च्या अगोदरच चाहूल लागते. त्यामुळे भूकंप किंवा इतर संकटाच्या वेळी ते प्राणी पूर्वसूचना देण्याचा प्रयत्न करतात! अर्थात प्राण्याचे हे वर्तन मनुष्यप्राण्याच्या ध्यानात यायला पाहिजे !

या त्यांच्या विशिष्ट गुणधर्माचा उपयोग लक्षात घेऊन आजमितीला संरक्षण दलांत (डिफेन्स फोर्सेस) कितीतरी श्वानपथके (आर्मी डॉग यूनिटस्) अस्तित्वात आहेत. श्वानांचा महत्त्वाचा गुणधर्म म्हणजे त्यांचे 'घ्राणेंद्रिय' अतितीक्ष्ण असते. एखाद्या विशिष्ट प्रकारचा 'वास' त्या प्राण्यांच्या कायम ध्यानातदेखील राहातो.

त्यामुळे सीमावर्ती प्रदेशांत आणि युद्धजन्य क्षेत्रांत अशा या श्वानपथकांचा विशेष उपयोग होत असतो. आपल्या देशात अशी ही श्वानपथके काश्मिरमध्ये तसेच उत्तरपूर्व प्रदेशातील दूरवर्ती, सीमावर्ती प्रदेशांत कार्यरत आहेत. देशांतर्गत इतर ठिकाणी सैन्याच्या प्रतिबंधित आणि अतिसंवेदनशील अशा ठिकाणी त्या श्वानांचा उपयोग केला जात असतो.

अशा प्रतिबंधित क्षेत्राच्या सभोवताल काटेरी तारांचे दुहेरी कुंपण असते. त्या दोन कुंपणाच्या मध्यातून असलेल्या खंदकातून हे प्रशिक्षित श्वान चोवीस तास गस्त घालत असतात. जर आगंतुकपणे कुणी त्या सीमेचे उल्लंघन केले तर हे श्वान सरळ त्याच्या नरड्याचाच घोट घेतात. हे ध्यानात राहण्याकरिता सैन्याच्या अशा प्रतिबंधित क्षेत्राच्या बाहेर 'श्वान गस्त घालीत आहेत, जागरूक रहा,' (बी अवेअर, डॉग्ज ऑन पॅट्रोल) असे फलक जागोजागी लावण्यात येतात.

मी नागालँडमध्ये सैन्यसेवेत असताना अशा एका श्वान पथकाच्या प्रमुखाने आम्हा काही ऑफिसर्ससाठी श्वानांचे एक प्रात्यक्षिक नियोजित केले होते. आमच्या युनिटमध्येच असलेल्या एका टेकडीवर त्याने एका श्वानाला आणले होते. शंभर फूट लांबीची पांढरी टेप आणून त्याचे एक टोक त्या श्वानाच्या गळ्यात आणि दुसरे टोक टेकडीवर रोवलेल्या खुंटीला पथकाच्या प्रमुखाने बांधले होते. आता त्या शंभर फूट परिसरांत टेकडीवर तो श्वान गस्त घालणार होता. त्या अंधाऱ्या रात्री आमच्यापैकी एका ऑफिसरला त्या टेकडीवर सावधपणे जाण्यास सांगितले. श्वानाच्या त्या परिसरात तो ऑफिसर शिरताच अजिबात पूर्वसूचना न देता अंधारात दबा धरून बसलेल्या त्या श्वानाने झपकन त्या ऑफिसरच्या दोन्ही खांद्यावर पाय रोवले आणि त्याच्या नरड्यावर तो तोंड घासू लागला ! अर्थात् त्याच वेळी श्वान पथकाच्या प्रमुखाने त्या श्वानाला चुचकारल्यावर, तो श्वान ताबडतोब शांत झाल्याचेही आम्ही बघितले; पण त्या ऑफिसरची मात्र त्यावेळी खूपच घाबरगुंडी उडाली होती. सांगायचे म्हणजे असे की, हे प्रशिक्षित श्वान प्रामाणिकपणे आणि अगदी डोळ्यांत तेल घालून आपले कर्तव्य बजावीत असतात.

सैन्यातील श्वानपथकांतील हे श्वान विशेषकरून काही खास जातीचे आढळतात. त्यामध्ये लॅब्रॅडोर, जर्मन शेफर्ड आणि बेल्जीयन शेफर्ड त्यांचाच प्रामुख्याने भरणा असतो. ते श्वान त्यांच्या एकूण अंगयष्टीमुळे चांगलेच भारदस्त

असतात. त्यांच्या नुसत्या आगमनाने देखील समोरचा इसम घाबरून अगोदरच जरा बचावाची भूमिका घेत असतो. त्यानंतर एकदा त्यांना प्रशिक्षण मिळाले की, कुठलाही मुलाहिजा न ठेवता ते आक्रमण करून आपली कार्यसिद्धी करतात! त्यामुळेच 'आर्मी डॉग्ज् ऑन पॅट्रोल' असा फलक पाहिल्यावर कुणालाही धडकी भरेल, यात शंका नाही.

मला आठवते इ.स. १९६६ मध्ये आपल्या देशाच्या पूर्व क्षेत्रांत असताना सैन्यदलाच्या अशा एका श्वानपथकाच्या युनिटला भेट देण्याची मला संधी मिळाली होती. त्यावेळी तिथल्या काही प्रशिक्षकांनी या श्वानांची करामत, प्रात्यक्षिके करून दाखविली होती. त्यावेळी प्रशिक्षकाने एका झाडाच्या बुंध्यामध्ये एक रुमाल अडकविला होता. त्या रुमालाला एका प्रशिक्षित श्वानाने हुंगले. त्यानंतर त्या श्वानाला त्या पटांगणाच्या बाहेर दूरवर नेण्यात आले. नंतर तो रुमाल आमच्यापैकी एकाच्या खिशात ठेवण्यात आला. आम्ही आठ-दहा जण एका रांगेत उभे राहिलो. त्यानंतर त्या श्वानाला तो रुमाल हुडकण्यास त्याच्या प्रशिक्षकाने सांगितले. त्या श्वानाने आमच्या समोरून एक फेरी मारली आणि दुसरी फेरी मारताना त्या श्वानाने ज्याच्या खिशात तो रुमाल होता त्यालाच बरोबर धरले.

आम्ही सिक्कीममध्ये असताना, आमच्यापासून दूरवर असलेल्या पहाडी इलाख्यात बाराही महिने बर्फ पडत असल्याने तो भाग सतत बर्फाच्छादित असायचा. तिथे पायदळाचे एक युनिट होते. त्यांचा एक मेजर, एक ऑफिसर तिथे बंकरमध्ये (बर्फातच खोदून केलेली लहानशी राहण्याची जागा) राहात असे. एका अंधाऱ्या रात्री त्या विभागात श्वान पथकाचा एक श्वान गस्त घालण्यासाठी कार्यरत होता. रात्री केव्हातरी नारळासारखी पण लहान गोल आकाराची एक वस्तू येऊन त्या बंकरवर पडली. लगेच त्या श्वानाने झडप घालून ती गोल वस्तू तोंडात पकडली आणि तो बंकरपासून दूर जात असतानाच मोठा स्फोट झाला. स्फोटामुळे ठिकऱ्या उडाल्या आणि त्यात तो श्वान मरून पडला. त्या स्फोटामुळे तो मेजर लगेच बंकरमधून बाहेर आला. ती गोल वस्तू म्हणजे हातबॉम्ब होता, हे त्या मेजरने ताबडतोब ताडले. काही प्रसंगी तर जिवाची पर्वा न करता हे प्रशिक्षित श्वान अशा रितीने आपली कार्यपूर्ती करीत असतात.

एकदा काश्मीरमधील निर्जन अशा दूरगामी प्रदेशात सतत चालू असलेल्या बर्फवृष्टीमुळे, परतताना, इच्छित स्थळी जाण्याच्या सर्व खाणाखुणा मिटल्या होत्या. मार्ग शोधून काढणे अतिशय बिकट झाले होते. अशा परिस्थितीत हे श्वान दिशेचे योग्य मार्गदर्शन करतात, असे मला अनुभवाने आता सांगता येईल. कारण चुकीच्या वाटेने गेल्यास हे श्वान अडून बसतात आणि अजिबात पुढे सरकत नाहीत! त्यांच्या या वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्मांमुळेच कठीण प्रसंगी त्यांच्यावर विसंबून राहता येते.

सैन्यदलातील हे प्रशिक्षित श्वान उगीचच येणाऱ्या-जाणाऱ्या कुणावरही असे भुंकत नसतात. कदाचित फक्त 'नेमून' दिलेले आमचे कार्य आम्हाला करायचे आहे, (वुई मीन बिझिनेस) अशीच त्यांची ओळख असावी. त्यांची अंगयष्टी आणि एकूण पिंडच मुळी इतरांना गर्भगळीत करेल असाच असतो.

सैन्याच्या श्वानपथकांतील श्वानांना मात्र संतुलित आणि विशिष्ट आहार द्यावाच लागतो. इतर 'सिव्हिल' कुत्र्यांबरोबर ते मिसळू नयेत, त्यांच्यामुळे या श्वानांना वाईट सवयी लागू नयेत, यासाठी सतत जागरूक राहावे लागते. त्यांच्या तैनातीला सैन्यातील दोन जवान प्रत्येक श्वानामागे देखभाल करण्यास ठेवावे लागतात. श्वानांचे प्रशिक्षणही नियमित चालू ठेवावे लागते. त्यामुळेच जोखमीच्या प्रसंगीदेखील ते श्वान आपले काम चोख पार पाडतात.

आतंकवादी प्रदेशांत, अतिरेक्यांच्या कारवाईत, हेरगिरी करणाऱ्या देशद्रोही इसमांना पकडण्यात, सीमावर्ती प्रदेशांतील भूसुरूंगाचा शोध लावण्याच्या कामी, निर्जन प्रदेशांत आणि सीमावर्ती भागांत हे श्वान उत्कृष्ट कामगिरी करीत असतात. या प्रकारची माहिती आम जनतेपर्यंत कमी पोहोचत असल्याने श्वानांच्या योगदानासंबंधी लिहिण्याचा हा एक प्रयास!

❖❖

- निवृत्त कर्नल अरविंद भावे
Flat No. 106 Daisy Block
L & T Serene Country
Gachibowli (Hyderabad-500032)

चित्रावरून निबंधलेखन...

– शैलजा देशमुख, शिल्पा कुलकर्णी

एखादं सुंदर चित्र तुम्ही पाहता, अशावेळी कुणी तुम्हाला विचारलं 'कसं वाटलं चित्र?' यावर 'छान', 'खूप आवडलं', 'नाही आवडलं बुवा' अशी वेगवेगळी उत्तरं तुम्ही द्याल. अशा प्रकारच्या उत्तरातून तुमच्या भावना ढोबळपणे व्यक्त होताना दिसतात. पण यांच्या पलीकडे जाऊन एखाद्या चित्राच्या आधारे आपल्या मनात जाग्या झालेल्या भावना, विचार, कल्पना सुसंगत पद्धतीने व मूळ विषयाच्या आशयाला धरून मांडणं म्हणजे चित्रावरून निबंधलेखन. त्यासाठी आधी चित्र डोळ्यांनी नीट पाहणं, अनुभवणं महत्त्वाचं असतं. चित्रातील रेषन्-रेष बोलकी असते. त्यातून घडणारं निसर्गाचं दर्शन, स्थलदर्शन, प्रसंग, चित्रातील व्यक्तिरेखा, त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, त्यांची वेषभूषा, त्यांच्या कृती, त्यांच्या आसपासचा परिसर आपल्याशी बोलत असतो. चित्रातील घटकांचा एक अखंड आकृतिबंध आपल्याला जाणवत असतो. तोच आपल्या चित्रावरून लिहिलेल्या निबंधात व्यक्त व्हायला हवा. तुमच्या कल्पनाशक्तीला, प्रतिभेला विहरायला येथे भरपूर वाव आहे. भाषाशैली, रचना यांतील वैविध्यामुळेही तुमचा निबंध सुंदर होईल; मात्र वाचणाऱ्याला एक सलग अनुभव तुमच्या निबंधातून मिळायला हवा हे मात्र निश्चित!

प्रथम चित्र बारकाईने न्याहाळा; चित्रातील विषय समजावून घ्या, त्यातील विविध घटकांची मनात नोंद करा. त्या घटकातून चित्रकाराला काय सांगायचंय ते जाणून घ्या. ते सर्व घटक एकत्रितपणे मांडताना चित्रकाराने काय विचार केला असेल, हे कल्पनेने जाणून घेण्याचा प्रयत्न करा.

आता थोडे स्वत:च्या मनात डोकावून पाहा. चित्र पाहताना तुमच्या मनात काही आठवणी जाग्या होतील; एखाद्या कवितेच्या ओळी आठवतील; अशाच प्रकारचा एखादा अनुभव तुम्ही घेतला असेल, त्याची आठवण होईल. या सगळ्याचा तुम्ही तुमच्या लेखनात वापर करू

शेजारील चित्राचं काय बरं म्हणणं असेल? पाहूया.

पावसाळ्यातील एक दृश्य! कोपऱ्यात दिसणारा एकच तरल सावळा मेघ; पण सगळ्या आभाळभर दाटून राहिलेल्या काळ्या मेघांचं अस्तित्व सूचकतेने दाखवणारा! बघताबघता पाऊस कोसळू लागतो. घरांच्या कौलांवर, पत्र्यावर तडम् तडम् ताशा वाजवत पाऊस वाजतगाजत धरतीला भेटायला येतो. पावसाचा तो नाद, छतावर कोसळणाऱ्या धारा दाखविण्यासाठी चित्रकाराने वापरलेल्या तिरक्या रेषांमधून, आपल्याला ऐकू येतो.

अवचित आलेल्या पावसाचे स्वागत करायला लहान-थोर, प्राणी-पक्षी, झाडं-रोपं सारीच आतुर होतात. मुलांच्या आनंदाला उधाण येतं. धो-धो पावसामुळे रस्त्यावरील खाचखळग्यांचेही रम्य तळे होते. मग कुणी बालक त्यात कागदाच्या होड्या सोडण्याचा आनंद लुटताना दिसतो. पाठीवर दप्तर घेतलेली शाळकरी मुलंही पावसात भिजत, साठलेल्या पाण्यात रमतगमत खेळताना दिसतात- कुणी छत्री घेऊन तर कुणी रेनकोट चढवून! प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहतोय. स्कूटरवरून जाणारी मुलगी थोडी घाबरलेली तरीही मुक्तपणे पाऊस

मेघ घनगर्द निळा, भासे कृष्ण तो सावळा। तहानलेल्या भुईवर, आज आनंद सोहळा।।

। **जरूर पाहा... आंबोली घाट धबधबा -** उंची ४०० फूट, आंबोलीजवळ (जि. सिंधुदुर्ग)।

प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे.

शकाल. मात्र 'चित्र' हे केंद्रस्थानी हवं. त्यामुळे चित्रापलीकडचा जो भाग तुम्ही वापराल, तो तुमच्या निबंधाचं सौंदर्य वाढवण्यासाठी योग्य प्रमाणातच हवा.

चित्राच्या वर्णनावर भर न देता चित्र पाहताना 'मला काय वाटलं' ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करा. मग तुमच्याच लक्षात येईल आपण किती वेगळा, स्वत:चा असा विचार करतोय ते! एकूण चित्र पाहून आपल्याला काय वाटतंय याची मनात नोंद केल्यानंतर प्रत्यक्ष लेखनाला सुरुवात करा. चित्राच्या वर्णनाला थेट सुरुवात न करता आकर्षक सुरुवात, परिणामकारक भाषाशैली, विविध भाव-विचारांसाठी स्वतंत्र परिच्छेद आणि निबंध परिपूर्ण वाटेल असा शेवट या रचनातंत्राकडेही लक्ष द्यायला हवं बरं का!

अशाप्रकारच्या निबंधलेखनातून तुम्ही दोन गोष्टी नकळत शिकाल. आपल्या भावना-विचार सुसंगतपणे व्यक्त करणं, त्याचबरोबर एखाद्या कलाकृतीकडे कसं पाहायचं, या रसास्वादाच्या दृष्टीची जाण येणं! मग केवळ चित्रच नाही तर एखादं शिल्प, एखादं गाणं, एखादा चित्रपट आपल्याला का आवडला हेसुद्धा तुम्हाला मांडता येईल.

कल्पकतेला वाव - मित्रांनो, चित्रावरून कसा निबंध लिहायचा त्याचं तंत्र आपण बघितलं. या तंत्राचा वापर करण्यासाठी या अंकाचे मुखपृष्ठ पाहा. ते पाहून तुम्हाला काय अर्थबोध झाला, तुमच्या मनात कुठले भावतरंग उमटले ते तुमच्या शब्दांत लिहा. तुमचा चित्रावरून तयार झालेला असा निबंध 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा.

अनुभवताना दिसतेय. वाऱ्यावर फडफडणारी तिची ओढणी, उडणारे केस यातून वाऱ्याचा वेग जाणवत राहतो. काहीजण पावसात भिजून आनंद घेतात तर काहींना पाऊस लांबून, घरात उबदार जागी बसून खिडकीतूनच अनुभवायला आवडतं, असंही दिसतंय. बघितलात तो मुलगा? समोर पुस्तकआहे; पण लक्ष मात्र खिडकीबाहेरच्या दृश्याकडे... आणि ती मुलगी हातात वाफाळत्या चहाचा कप; पण मग्न होऊन पावसाच्या रंगगंधाचं लेणं लुटतेय; कुणाकुणाकडे म्हणून तिचं लक्ष नाही या क्षणी!

छत्र्या, रेनकोट, छान ऊबदार घर, चहाचा गरमागरम कप हे सुख मात्र सर्वांच्या नशिबी असतंच असं नाही. अंगात पुरेसे कपडे नसलेली ती दोन मुलं बघा; पाईपमध्ये त्यांनी तात्पुरता आसरा शोधलाय. एक मजेत बाहेरचा पाऊस पाहातोय तर दुसऱ्याचा चेहरा थोडा चिंतेत पडल्यासारखा. रेनकोट, छत्री घेऊन पावसात भिजणाऱ्या मुलांचा त्यांना थोडा हेवाच वाटत असावा कदाचित! मात्र पाईपमध्ये आसरा शोधण्याची त्यांची कल्पकता अफलातूनच! हे झालं भर गर्दीच्या रस्त्यावरचं दृश्य.

पण थोडं गावाबाहेर पडलं, की वेगळंच दृश्य दिसतंय. शेतीच्या कामांना वेग आलाय. डोईवर इरलं घेऊन भात लावणीचं काम जोमाने सुरू झालंय. हे दृश्य बघताना एका कवितेतील ओळी आठवून गेल्या-

पाने तरारली सारी, लाख अंकुर फुटले
पाणी झेलता मातीला, नकोनकोसे जाहले
कोंब नव्या जीवनाचा, आता बीजाबीजात खळाळे-

शेताजवळच्या झोपडीच्या दारात एक मुलगी कोकराला कुशीत घेऊन बसलीय तर कुणी शेळी आपणहून आडोशाला येऊन उभी राहलीय.

पावसाच्या सरी झाडांच्या फांद्यांवर अलगद पडताहेत. पानापानांवर, पक्ष्यांच्या पंखांवर पावसाचे थेंब हेलकावताहेत. काय असेल पक्ष्यांच्या मनात? घरट्यांतल्या पिलांची काळजी? पावसाच्या थांबण्याची वाट पाहाणं? की हा क्षण फांदीवर झुलत अनुभवणं?... कुणास ठाऊक!

तिकडे दूरवर पावसाने चिंब झालेल्या ओल्या रानात काही मस्त कलंदर मुलांना, डोंगर खुणावतोय. पावसाची, वाऱ्याची पर्वा न करता वर्षासहलीच्या भटकंतीला निघालेली ती मुलं!

असा हा चित्रातला पाऊस भर गर्दीच्या शहरातला आणि शेतं, डोंगर, रानं अशा ग्रामीण भागातलाही. पक्ष्यांचा, प्राण्यांचा, शेतकऱ्यांचा, सुखवस्तू मुलांचा आणि हातावर पोट असणाऱ्या गरीब मुलांचाही! चित्रात दिसणाऱ्या, न दिसणाऱ्या सर्व सजीवांचा आहे. सगळ्यांना चैतन्य, आनंद, उत्साह देणारा सावळ्या घनांतला आणि आपल्या सर्वांच्या मनातलाही!

- शैलजा देशमुख,
सी - १०२, पाटे संस्कृती, सहकारनगर क्र. २, पुणे ९
- शिल्पा कुलकर्णी
shilpashri.kulkarni@gmail.com

सागराच्या किनारी मी, घर वाळूचे बांधले। धार पावसाची येता, सारे स्वप्नच भंगले।।
। **जरूर पाहा... व्याघ्रेश्वर धबधबा -** उंची ३०० फूट, मणचेजवळ (जि. सिंधुदुर्ग)।
प्रायोजक - डॉ. संतोष काकडे, बंगळुरू.

'श्री' गजाननासाठी मखर

मधुकर पालकर

गणेश सजावटीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे मखर, सुशोभनासाठी पताका! यावर्षी गणेशोत्सवात घरी/शाळेत सुशोभन करण्यासाठी छात्र प्रबोधनमध्ये यापूर्वी येऊन गेलेल्या या दोन उपयुक्त कलाकृती जरूर करून पाहा! पाहूया त्यांची कृती.

आपल्या घरामधील श्रीगणेशाची मूर्ती ही साधारणपणे १० ते १५ सेंमी रुंद व २० ते २५ सेंमी उंचीची, बसलेल्या स्थितीत असते. त्या अंदाजानंच आपल्याला मखर बनवायचे आहे.

साहित्य – जाडसर ड्राईंग पेपर, आर्ट पेपर, पुठ्ठा किंवा कार्डशीटस्, थर्माकोल, रंगपेटी, स्केच पेन, फेव्हिकॉल, कात्री इ.
कागदाचा आकार ४० सेंमी रुंद व ६० सेंमी उंच असावा.

कृती –

१) प्रथम कागदाच्या चारीबाजूस १ ते २ सेंमी जागा सोडून घ्या.

२) ह्या चौकोनात मध्यभागी उभी रेषा काढा.

३) आता मध्य रेषेवर तळापासून १ सेंमी – पुढे ३ सेंमी – पुढे २ सेंमी –१ सेंमी– २ सेंमी – २० सेंमी – २ सेंमी – ३ सेंमी –१ सेंमी –८ सेंमी – १/२ सेंमी –३ सेंमी व पुढे २ सेंमी याप्रमाणे बिंदू नोंदवून घ्या.

४) परत तळामधील मध्यबिंदूपासून दोन्ही बाजूस ८ सेंमी अंतरावर एक एक बिंदू काढा व त्या बिंदूमधून दोन सरळ उभ्या रेषा ५० सेंमी काढा व दुसरा चौकोन तयार करा. (१६ × ५०)

५) मध्य रेषेवर आकृती क्र.१ प्रमाणे जसे बिंदू नोंदवले आहेत तसेच उभ्या दोन सरळ रेषांवर बिंदू नोंदवून घ्या व आकृती क्र.१ मध्ये दाखविल्याप्रमाणे पुसट समांतर रेषा काढा.

६) या समांतर रेषांच्या साहाय्याने आकृती क्र. १ मधील चित्रात



आकृती क्र. १

दाखविल्याप्रमाणे अर्ध्या भागात तळापासून पाया– मखराचा पाया – खांब – छताचा आधार– छत व कळसापर्यंतचा भाग पूर्ण करा.

७) हा भाग पूर्ण झाल्यावर मध्येरेषेच्या उजव्या बाजूसही तसाच भाग पूर्ण करा, म्हणजे मखर तयार होईल.

८) ह्या मखरावर देवळाच्या गाभाऱ्यात किंवा देवळाच्या भिंतीवर, कळसावर असते त्याप्रमाणे पानेफुले–जाळी – वर्तुळाकार रचना काढा. माहितीसाठी सोबत काही नमुने दाखविले आहेत. अर्ध्या भागात नक्षीकाम केल्यावर ट्रेसिंग पेपरच्या साहाय्याने दुसऱ्या भागात चित्ररचना पूर्ण करा.

९) मखर रंगविताना काही भाग दाट व काही भाग पुसट असे रंगवा. रंग रचना – पिवळा + पांढरा (देवळाप्रमाणे), फिकट निळा + पांढरा (चकचकीत टाईल्सप्रमाणे), तांबडा+पांढरा (वीटकाम केल्याप्रमाणे), तपकिरी + पिवळा + पांढरा (प्लायवुड) इ. प्रमाणे करा. कमानीच्या मध्यभागी छोटीशी घंटा अडकवा.

इतर – १) नंतर मखर कडेने कापा व जाडसर पुठ्ठा अथवा थर्माकोल शीटवर चिकटवा व गजाननाची मूर्ती ठेवण्यासाठी मधला भाग कापा.

२) अशी ४ मखरे तयार करून देवळाचा देखावा तयार करता येईल. फक्त वरील बाजू बंद करून

मोठी माणसे म्हणती, पिरपिर पावसाची। माझ्या मनात दाटते, लयलुट आनंदाची।

। **जरूर पाहा... रंधा धबधबा -** उंची ३५० फूट, नाशिकजवळ (जि. अहमदनगर)।

प्रायोजक – श्री. सुधीर विष्णू दफ्तरदार, पुणे



आकृती क्र. २



आकृती क्र. ३



मखराच्या भिंतींसाठी
ही नक्षी वापरता येईल.

घ्यावी लागेल.

३) पुढील बाजूस दोन चाके दाखविल्यास रथ तयार करता येईल. रथापुढे हत्ती- घोडा - मोर अथवा उंदीर ह्याचे चित्र जोडावे. (या ठिकाणी मूर्तीचे तोंड मात्र त्या दिशेला ठेवावे लागेल) (आकृती क्र. ३ पाहा)

४) धारदार पात्याने नक्षीमधील काही भाग कापून आतील बाजूने रंगीबेरंगी कागद चिकटवा. यामागे मंद प्रकाश - योजना केल्यास सजावट आणखी खुलून दिसेल.

आपल्या घरामधील जागा, गणेशमूर्तीची उंची, रोजची पूजाअर्चा इ. गोष्टींचा विचार करून कमानीची मापे, लांबी, रुंदी, कमी-जास्त करा.

❖❖

- मधुकर पालकर

(पुर्नमुद्रण - छात्र प्रबोधन सौर श्रावण, शके १९२६/ ऑगस्ट २००३) १०२१/२२ सदाशिव पेठ, नागनाथपार, पुणे - ४११०३०.

सुंदर पताका



गणपतीची आरास करताना पताका या हव्यातच. रंगीबेरंगी पताकांमुळे गणपतीच्या सजावटीमध्ये भरच पडते.

साहित्य - पतंगासाठी जो कागद वापरतात तसा रंगीत कागद, सुतळी, फेव्हिकॉल, कात्री वगैरे.

कृती - पतंगाच्या कागदाचा २० सें.मी. × १२ सें.मी. च्या आकाराचा रंगीत तुकडा घ्या. त्याची बरोबर मध्ये घडी घाला (आकृती १). आकृती २ मध्ये दाखविल्याप्रमाणे पेन्सिलने अर्ध्या पानाच्या आकाराची आकृती काढून घ्या. रेघांनी दाखविलेला भाग कापून घ्या. आता आकृती ३ मध्ये दाखविल्याप्रमाणे पेन्सिलने घडीवर वेगवेगळे आकार काढून घ्या. कात्रीच्या साहाय्याने हे आकार कापून घ्या. अशाप्रकारे पानाव्यतिरिक्त वेगवेगळे आकार बनवून घ्या. झाल्या की नाही रंगीबेरंगी छान पताका तयार ! व शेवटी ३ ते ४ मीटर लांब सुतळीवर हे तुकडे फेव्हिकॉलने लावून घ्या.

- मेधा सुदुंबरेकर

(पुर्नमुद्रण - छात्र प्रबोधन सौर श्रावण, शके १९२४/ऑगस्ट २००१) २६, मित्रमंडळ कॉलनी, पर्वती, पुणे - ९

येता पहिला पाऊस, असे आनंद सोहळा। आनंदात भिजण्यास, होती बालचमू गोळा।।

। **जरूर पाहा... धोबी धबधबा -** उंची ४५० फूट, महाबळेश्वर, कोयना नदी खोऱ्यात (जि. सातारा)।

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे.

रुपयाची किंमत !!

– डॉ. मुकुंद महाजन

रुपयाचं मूल्य घसरतंय, त्याचं 'अवमूल्यन' होतंय, अशा बातम्या अनेक दिवस आपण वाचतोय, ऐकतोय! मग रुपयांचं मूल्य म्हणजे काय? ते मूल्य कशावरून ठरतं? रुपयाचं मूल्य घसरतं म्हणजे नक्की काय होतं? त्याचे परिणाम काय होतात? त्यावर उपाय कोणते? हे आणि असे अनेक प्रश्न तुम्हाला सध्या पडलेत, हो नं...? काही प्रश्नांची उत्तरे मिळण्यासाठी आणि काही प्रश्नांची उत्तरे धडपड करून शोधण्यासाठी हा लेख अवश्य वाचा.

'रुपयाची नीचांकी घसरण' अथवा 'रुपयाची घसरगुंडी' अशा प्रकारच्या बातम्या गेले अनेक दिवस वर्तमानपत्रातून येत आहेत. रुपयाचे 'अवमूल्यन' होते आहे, असा याचा अर्थ सांगितला जातो. शास्त्रीयदृष्ट्या जाणीवपूर्वक रुपयाची किंमत कमी केली जाते, तेव्हा त्याला 'अवमूल्यन' (Devaluation) असे म्हणतात. जेव्हा खुल्या बाजारात आपल्या चलनाची किंमत कमी होते तेव्हा तो 'मूल्यऱ्हास' (Depreciation) असतो. विदेशी चलनाशी रुपयाचा संबंध विशिष्ट दराने स्थिर ठेवलेला असतो. विनिमय दरानुसार काही वेळा जाणीवपूर्वक रुपयाचं 'अवमूल्यन' करण्याचा प्रसंग येत असतो. आता हा विनिमयदर (Rate of Exchange) बाजारातील'मागणी–पुरवठ्या'च्या प्रेरणांवर मोकळा सोडलेला असल्याने, खुल्या बाजारात रुपयाची किंमत कमी–जास्त होत राहणे अपरिहार्य असते.

विदेशी विनिमय बाजार – डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत महत्त्वाची मानली जाते; कारण 'डॉलर' जगातील अनेक देशात स्वीकारला जातो. त्यामुळे डॉलर एक आंतरराष्ट्रीय चलन – एक मोजपट्टी– मानली जाते. कोणत्याही 'वस्तूच्या बाजारात' वस्तूची किंमत जशी मागणी–पुरवठ्यावरून ठरते तशीच कोणत्याही देशाच्या चलनाची किंमत विदेश–विनिमय बाजारातील (Foreign Exchange Market) त्या चलनाच्या मागणी–पुरवठ्यावरून ठरते. डॉलरची 'रुपये घेऊन डॉलर द्या' अशी मागणी वाढली, की डॉलरची किंमत ५० रु... ५५ रु... ६० रुपये अशी वाढत जाते. म्हणजेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाली, असे म्हणतात.



विदेशी चलन आणि रुपया यांच्या–मधील देवाण–घेवाण भारतातील विदेश–विनिमय बाजारात होते. म्हणजेच भारतातील बँका, इतर परवानाधारक संस्था वगैरे या व्यवहारात सहभागी असतात; पण भारतातील हे व्यवहार दिवसाच्या ठरावीक वेळेत म्हणजे सकाळी ९ ते संध्याकाळी ५ या वेळेतच होतात. या काळात प्रत्यक्षपणे रुपये आणि डॉलर, रुपये आणि युरो, रुपये आणि येन अशी देवाणघेवाण होते आणि भारतीय बाजारातील त्या दिवशीच्या 'मागणी पुरवठ्या'वरून ठरणारा दर हा 'हजर' (spot) म्हणजे 'त्या वेळ'चा दर म्हणून ओळखला जातो. पण जागतिक विनिमय बाजार २४ तास चालू असतो. कारण येथे रात्र असली तरी पश्चिमेकडील अनेक देशात दिवस असतो. (थोडक्यात 'या निशा भारतीयानां तस्यांजागर्ति अम्रिकी!') त्यामुळे भारतीय प्रमाणवेळेप्रमाणे संध्याकाळी ५ ते दुसऱ्या दिवशी सकाळी ९ पर्यंतच्या सोळा तासात होणारे जागतिक पातळीवरील व्यवहार प्रत्यक्ष चलनांच्या हस्तांतरणाविना (Non-deliverable) अशा म्हणजेच 'वायद्या'च्या स्वरूपाचे होतात. हे दर परिकल्पनांवर म्हणजेच 'भारतीय बाजाराच्या सुरुवातीला काय दर असेल' या अंदाजावर ठरतात. अर्थात 'रुपया आणखी घसरत जाईल', अशीच अटकळ जर बहुसंख्य लोकांची असेल तर रुपयाची किंमत कमी कमी सांगितली जाते आणि त्या कमी किंमतीला व्यवहार पूर्ण केले जातात. वायदेबाजारातील या व्यवहारांचा परिणाम होऊन देशातील 'हजर बाजारा'तील दरही कमी होतो. म्हणजेच विदेशी चलन महाग होते. अशा परिस्थितीत डॉलरचा पुरवठा वाढला अथवा रुपयाची मागणी वाढली तर रुपयाचे मोल वाढू शकते.

शाळेच्या मैदानात, आम्ही लावतो हजेरी। सर पावसाची येता, होई सुट्टीही साजरी।।

। **जरूर पाहा... झेनिथ धबधबा** - उंची ४५० फूट, खोपोलीजवळ (जि. ठाणे)।

प्रायोजक – सौ. प्राची अमर परांजपे, सांगली.

चलनाचे मूल्य – कोणत्याही चलनाचे खरे मूल्य त्या चलनाच्या क्रयशक्तीवर अवलंबून असते. यात अंतर्गत आणि बाह्यमूल्य असाही फरक करावा लागतो. भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवरून रुपयाचे **बाह्यमूल्य** ठरते. उदाहरणार्थ, भारतातून फक्त एकाच प्रकारचे कापड, ही एकच वस्तू निर्यात होते असे मानूया. जर या कापडाचा भाव १०० रु. मीटर असेल, तर रुपयाचे बाह्यमूल्य ०.०१ मीटर कापड असे येईल. याचप्रकारे डॉलरचेही बाह्यमूल्य ठरते. उभय चलनांच्या अशा बाह्य क्रयशक्तीवरून '१ डॉलर बरोबर किती रुपये' हा विनिमय दर ठरेल.

विनिमयदरात चढ–उतार होणे अथवा हा दर अस्थिर असणे, हितावह नसते. भारतीय वस्तू व सेवा यांचे मूल्य सतत खालीवर होण्यात अनेक धोके आहेत. विदेशी ग्राहक, गुंतवणूकदार आणि पर्यटक या सर्वांच्याच दृष्टीने नफा मिळवणे, विशिष्ट किंमतीला भारतीय वस्तू मिळतील याची खात्री असणे, तसेच गुंतवलेल्या निधीवर दीर्घकाळात निश्चित उत्पन्न (डॉलरमध्ये) मिळेल याची शाश्वती असणे चलनातील चढउतारामुळे शक्य होत नाही. म्हणून ग्राहकाच्या इच्छा विक्रेत्यांपर्यंत पोहोचवण्याचे बाजाराचे कार्य सुरळीत चालावे इतपत लवचीकता विनिमयदरात राहावी. त्यामुळे चलनात चढउतार होऊ नयेत अथवा सतत मूल्यऱ्हास होऊ नये हे पाहावे लागते. ही जबाबदारी देशाच्या मध्यवर्ती बँकेवर म्हणजेच रिझर्व्ह बँकेवर आहे. यासाठी एक पर्याय म्हणजे नियंत्रणात्मक उपाय रिझर्व्ह बँक करू शकते. पण वर उल्लेखलेल्या देशाबाहेर चालणाऱ्या व्यवहारांवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण नसते. भारत सरकारलाही कर आणि खर्च यांच्याद्वारे (Fiscal measures) उपाययोजना करता येत नाहीत. दुसरा पर्याय म्हणजे बाजारात हस्तक्षेप करून अप्रत्यक्षपणे विनिमय दर नियंत्रित करणे हा असतो. यासाठी रिझर्व्ह बँकेला आपल्याजवळच्या विदेशी चलन साठ्यातून विक्रीसाठी डॉलर बाजारात आणावे लागतील. एका आंतरराष्ट्रीय अहवालानुसार आज रिझर्व्ह बँक फार तर ५०० ते १००० कोटी डॉलर्स विक्रीसाठी आणू शकेल. रिझर्व्ह बँकेकडील विदेशी चलनाची गंगाजळी २,८०० कोटी डॉलर्स एवढीच आहे; आणि या साठ्यावर हक्क सांगणाऱ्या अनेक बाबी 'आ' वासून उभ्या आहेत. तुलनेने पाहता चीनजवळ ३३,१०० कोटी डॉलर्सची गंगाजळी आहे, हे लक्षात घ्यावे. म्हणजेच हा मार्ग स्वीकारल्यास बघता बघता सर्व गंगाजळी संपून जाईल.

मूल्य ऱ्हासाचे मूळ – रुपयाची घसरगुंडी हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या गैरव्यवस्थापनाचे जागतिक स्तरावर उमटलेले एक प्रतिबिंब आहे. एक साधी गोष्ट अशी आहे की, देशातल्या देशातच होणारी सार्वत्रिक भाववाढ म्हणजे रुपयाचा मूल्यऱ्हासच आहे. वस्तूंच्या किंमती वाढणे म्हणजेच रुपयाचे मूल्य कमी होणे. हा मूल्यऱ्हास अपरिहार्यपणे परराष्ट्रव्यवहारात प्रतिबिंबित होणारच. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, जेव्हा भाववाढ सातत्याने होत राहते, तेव्हा उत्पादनापेक्षा सट्टेबाजी अधिक आकर्षक ठरते. कारखाना चालवून कच्च्या मालाच्या उपलब्धतेची शाश्वत सोय, वीज/डीझेल इ. मिळण्याची खात्री, वाहतुकीची खात्री, कामगार मिळतील–टिकून राहतील आणि औद्योगिक तंटे उद्भणार नाहीत याची खात्री, कारखान्यावर मोर्चा येऊन तोडफोड होणार नाही याचा भरवसा... अशा कितीतरी चिंता उरी बाळगून शेवटी हाती काय लागेल याची खात्री नसते. यापेक्षा 'आज मालमत्ता विकत घ्या, वर्षभराने विका', असे केल्याने हमखास उत्तम नफा होतो हे दिसते आहे. यामुळे सट्टेबाजीला ऊत आला आहे: परकीय चलनव्यवहार, जमीन, भूखंड व फ्लॅटचे व्यवहार, क्रिकेटमध्ये फिक्सिंग, कोळसा खाणींचा सट्टा... अशी किती उदाहरणे द्यावीत? परिणामी कारखानदारी उत्पादन, शेतीचे उत्पादन, हस्तोद्योगाचे उत्पादन थंडावले. रुपये देऊन घेण्यासारख्या वस्तूंचीच टंचाई असेल तर रुपयांची मागणी कोण कशासाठी करील? किंमत कमी होत जाणारे रुपये जवळ ठेवण्यापेक्षा भूखंड, सदनिका, सोने–चांदी अथवा परदेशातील बँकात डॉलर–युरो–पौंड ठेवणे लोक पसंत करतात. पण 'मूर्त' वस्तूंचे आणि वीज–पाण्यासारख्या सुविधांचे उत्पादन वाढत नसल्यामुळे नुसतीच भाववाढ होत राहणार. त्यातूनच रोजगार हमी आणि अन्नसुरक्षेसारख्या योजनांवर प्रचंड प्रमाणात खर्च होणारा पैसा इच्छित ठिकाणी न पोहोचता खाबूबहाद्दरांच्या खिशात जातो तेव्हा काळ्या पैशाचा

रिमझिम, रिमझिम, धार पावसाची येते। तिच्या मनाचं गुपित, मला सांगुनिया जाते।।

। **जरूर पाहा... चिंचोटी धबधबा -** उंची १०० फूट, वसईजवळ (जि. ठाणे)।

प्रायोजक – स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे.

नंगानाच सर्वदूर पसरतो.

आर्थिक गैरव्यवस्थापन – आर्थिक गैर–व्यवस्थापनाच्या निवडक उणिवा सांगता येतील:

१. किंमती नियंत्रित करण्याच्या अनेक उपाययोजना, उदा. निवडक पतनियंत्रणाचे अनेक उपाय, रिझर्व्ह बँकेकडे असून त्यांचा अवलंब रिझर्व्ह बँक का करीत नाही?

२. वस्तूंच्या खरेदी–विक्रीतील वायदेव्यवहारांना पायबंद घालून 'ट्रेडिंग'च्या नावाखाली जे 'अनर्जित' उत्पन्न लक्षावधी लोक कमावत आहेत, ते नियंत्रित का केले जात नाही? 'अनर्जित' उत्पन्नाचा उत्कर्ष हा 'कष्टार्जित' उत्पन्नाला घातक ठरतो. कष्ट न करता झालेला विकास, जगात आजतागायत कोणत्या देशाने साधला आहे?

३. रस्ते, पूल, वीज प्रकल्प इ.मधील गुंतवणूक फलद्रूप होण्यास दीर्घकाळ लागतो. तोवर लोकांच्या हातात नुसता पैसा पडत राहतो; पण तो जेव्हा बाजारात जातो, तेव्हा लोकांना हव्या असणाऱ्या दूध, ब्रेड, कापड, चहा अशांसारख्या उपभोग्य वस्तूंचे उत्पादन वाढविण्याची तरतूद होत नाही तेव्हा केवळ महागाई होत राहते.

४. विदेशातून भांडवल आयात होते तेव्हा विदेशातील काळा पैसा पांढरा करून आणला जातो. यातून केवळ भाववाढच होते.

५. ज्यांच्या प्राथमिक गरजाही पूर्ण होत नाहीत अशी प्रचंड लोकसंख्या आणि दुसऱ्या बाजूला मूठभर लोकांकडे चंगळ करण्यासाठी मुबलक पैसा ही विषमता आणि तीही वाढत जाणारी! लोकांच्या किमान गरजा भागवण्याची तरतूद नको का?

६. भ्रष्टाचाराची उदाहरणे देण्याचीही गरज नाही; पण तो कोण रोखणार?

या सर्व प्रश्नांच्या उत्तरात रुपयाचे म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेचे सामर्थ्य सामावलेले आहे.

❖ ❖

– **डॉ. मुकुंद महाजन**
६/४, रामबाग कॉलनी, नवी पेठ, पुणे ३०

करून तर पाहा... थर्माकोलच्या ग्लासची फुले

साहित्य : थर्माकोलचे ग्लास, जलरंग, तार आणि जाड स्ट्रॉज, फेव्हीकॉल, थर्माकोलचे रंगीबेरंगी गोळे, झाडूच्या काड्या, प्लास्टीक डबा अथवा फुलदाणी.

कृती : प्रथम थर्माकोलचा ग्लास रुंद बाजूकडून एक ते दीड इंच आपल्याला ज्या आकाराची फुले करायची आहेत त्याप्रमाणे कापून घेणे (आकृती क्र. १ व २ प्रमाणे). नंतर त्याला आकृती ३, ४, ५ प्रमाणे पाकळ्यांना वरच्या बाजूने त्रिकोणी/अर्धवर्तुळाकार आकार देणे. त्या पाकळ्यांना जलरंग देऊन फूल तयार करून घेणे. फेव्हीकॉल लावून फुलाच्या मध्यावर रंगीत थर्माकोलचे गोळे, फोटोत दाखविल्याप्रमाणे पूर्ण चिकटविणे व जाड स्ट्रॉ लावून फूल तयार करून घेणे. आकृती ६ प्रमाणे तारेत थर्माकोलचे गोळे व प्लस्टिकची फुले ओवून सुशोभन तुरे तयार करून घेणे. झाडूच्या काड्या हिरव्या जलरंगात बुडवून वाळवून घेणे. प्लास्टीकच्या डब्याला लेस, टिकल्या, मणी यांनी सजवून घेणे. त्यात वाळू भरून घेणे व आपल्याला हवी तशी फुले लावून घेऊन फुलांचा गुच्छ तयार करणे किंवा तयार केलेली वेगवेगळी फुले घेऊन फुलदाणीत सजवून ठेवणे. घरच्याघरी आकर्षक कलाकृती तयार होईल.


आकृती १


आकृती २


आकृती ३


आकृती ४

आकृती ५

आकृती ६

– **शोभना साठे,** 'दीपक', ११४३ शुक्रवार पेठ, पुणे 411002

असा बरसला मेघ, आली सरीवर सर। रूप हिरवं हिरवं, धरणीचं हे साजरं।।

। **जरूर पाहा... नागरतास धबधबा -** उंची ३२० फूट, कणकवलीजवळ (जि. सिंधुदुर्ग)।

प्रायोजक – श्री. अजित विद्याधर परांजपे, अमेरिका.

भीम पराक्रम

– विद्याधर म्हैसकर

वेळ दुपारची. सर्वत्र सामसूम.

अंगात लाल हिरव्या चौकड्याचं जाकीट घातलेलं, लाल तोंडाचं माकड भर वस्तीत आलं. त्याचं अंग केसाळ; हळदीसारखं पिवळं पिवळं. झाडू सारखी शेपटी; उभी. गळ्यात पट्टा आणि अर्धवट तुटलेली लोखंडी साखळी.

रस्त्याच्या दोन्ही बाजूला बंगले. माकडाला कुतूहल फार. बघत बघत चाललेला. यादवांचं घर पहिलं. त्यांच्या अंगणात हँगरला कोट अडकवलेला दिसताच माकडानं कुंपणावर उडी मारली. तिथून अंगणात. दोन पायांवर उभं राहून त्यानं सराईतपणे खिसे तपासले. खायला काही मिळालं नाही पण एक मोठी नोट चुरगळलेली मिळाली ती उलगडून बघितली. मग घडी करून स्वत:च्या खिशात ठेवली. रिकामा कोट दिला भिरकावून.

'चला, आता पुढं जाऊ', असं म्हणत जाधवांच्या बंगल्यावर गेला. तिथं टेलिफोन दुरुस्तीसाठी आलेल्या लोकांनी त्यांचं सामान ठेवलेलं. त्यात एक मोठं रीळ. त्याला काळी केबल गुंडाळलेली.

माकडानं केबलचं टोक हातात पकडून ओढताच रीळ चालायला लागलं. तसं त्यानं ते उचललं अन रस्त्यावर फेकून दिलं. रीळच ते रस्त्यानं पळत सुटलं. मागं केबल

माय लेकराचं नातं, धरणी नि आभाळाचं। ओढ लागते भेटीची, जुळे नातं पावसाचं।।

। **जरूर पाहा... सहस्त्रकुंड धबधबा** - उंची १५० फूट, उमरखेडजवळ (जि. यवतमाळ)।

प्रायोजक – श्री. राजेश शंकर शेलार, पुणे.

सुटत चालली. रस्त्याच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत केबल पसरली.

माकडाला भूक लागली होती. कुलकर्ण्यांचा कुत्रा-बाब्या सावलीत झोपलेला. त्याच्या पुढ्यात थाळी. त्यात एक बटर शिल्लक. कुत्रा साखळीनं बांधलेला. जो बंधनात असतो तो काही करू शकत नाही; हे माकडाला चांगलं माहीत होतं. धिटाईनं तो पुढं झाला. बाब्यानं डोळे उघडले. थाळीतला बटर माकड घेणार असं वाटताच त्यानं झेप टाकली; पण साखळीची ओढ लागून बाब्या मागं खेचला गेला. माकडानं हसत हसत बटर पळवला. खरं तर तो दोन दिवसांचा उपाशी होता. तो खोतांच्या बंगल्यात उतरला. तिथं खोत आजी उन्हाला पाठ लावून शेकत बसलेल्या. हातात काठी. ती पाहताच माकड पळालं.

कुठून तरी उकडलेल्या भुईमुगाच्या शेंगांचा वास येत होता. तो कुठून येतोय ते त्यानं लगेच ताडलं. खोतांच्या बंगल्यासमोरच्या घराकडं त्यानं मोर्चा वळवला. कुंपणावरून छज्ज्यावर आणि तिथून स्लॅबवर गेला. मिठाच्या पाण्यात उकडलेल्या शेंगा पोत्यावर पसरून वाळवत ठेवलेल्या. माकडानं शेंगांचा फडशा पाडला.

आपल्या अंगणात कोणी पोऱ्या डोकावून गेला एवढं आजींना कळलं होतं. त्यांनी समोरच्या बंगल्याकडं बघितलं. लाल हिरव्या चौकड्याचं कापड अंगात घालून, कोणी पाठमोरा बसलेला त्यांना दिसला. त्यांना वाटलं, कुंदाताईंनी सांडगे पापड घातले असतील आणि राखणीला बसवलं असेल कोणाला तरी....

चला. बघूया म्हणून त्या गेल्या.

कुंदाताईंची बेल सात वेळा वाजवली. मग कडी वाजवली पांचदा. अखेर हाका मारल्या. तीन.

कुंदाताईंनी दार उघडलं.

भिजुनिया पावसात, सारे आनंदे नाचती। अन् पावसाच्या संगे, झिम्मा फुगडी खेळती ।।

। **जरूर पाहा... दोधवने-तिवरे धबधबा -** उंची २०० फूट, संगमेश्वरजवळ (जि. रत्नागिरी)।

प्रायोजक – सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे.

म्हणाल्या, 'आजी बेल वाजवायची'

''वाजवली पण मला देखील ऐकू आली नाही''

''अगं बाई ऽ लाईट गेलेत की काय?''

लाईट खरंच गेले होते.

आजींनी कुंदाताईंना विचारलं, ''वरती राखणीला कोण बसलंय?'' त्याबरोबर कुंदाताई हादरल्याच. ''थांबा आलेच'', म्हणून जिन्यानं वर गेल्या. पाहतात तो काय लाल तोंडाचा हुपल्या बसलेला. त्यांना बघून हुपल्यानं राहिलेल्या चिपटभर शेंगा डाव्या गालफडात आणि चिंपटंभर शेंगा उजव्या गालफडात भरल्या.

''पुरुष माणसाखेरीज हा हुपल्या कोणास दाद देणार नाही. नवऱ्याला फोन करून घरी बोलवावं हे बरं', म्हणून घाईघाईनं त्या खाली आल्या.

फोन फिरवला. एकदा. दोनदा. पण रिंगच वाजेना. लाईट गेलेले आणि फोनही डेड झालेला. आता काय करावं या विचारात त्या आणि आजी बाहेर आल्या, तर बाहेर बराच गोंधळ चाललेला.

यादव बाईंची तक्रार होती, त्यांचा कोट कोणी भिरकावला? जाधव काकी म्हणत होत्या, हे रीळ कोणी उलगडलं? आणि कुलकर्णी वहिनींना कळत नव्हतं, की त्यांचा कुत्रा अजूनही का केकाटत होता?

याच वेळी एक माकडवाला आला. त्याच्या एका हातात दोरीला बांधलेली लाल तोंडाची माकडीण. तिच्या अंगात धारवाडी खणाची चोळी. आणि दुसऱ्या हातात भुईमुगाच्या शेंगा. एकूण प्रकार माकडवाल्याच्या लक्षात आला. आपला 'भिम्या' इथंच कुठंतरी असणार, अशी त्याची खात्रीच झाली. कारण हा एवढा पराक्रम दुसरं कोण करणार? भीमच करू शकेल.

त्यानं हाका मारायला सुरुवात केली, ''भिम्या ये. मी काय घेऊन आलोय ते बघ. तुझ्या आवडत्या भुईमुगाच्या शेंगा... आणि भिमी.''

ओळखीचा आवाज ऐकून भिम्या कुंपणावर येऊन बसला. जरा रागारागानंच, शेंगदाणे खाऊन, शेंगाची फोलकटं, 'फू-फू' करून माकडवाल्याकडं उडवली. तेव्हा माकडवाल्यानं साफ कबुली दिली '' भिम्या. माझी चूक झाली. दारूच्या नशेत मी तुला विनाकारण काठीनं मारलं. तू साखळी तोडून पळून गेलास तेव्हापासून 'भिमी'नं काही काहीसुद्धा खाल्लेलं नाही. भिमीची शपथ घेऊन सांगतो. यापुढे दारू कधीही पिणार नाही, तुला मारणार नाही.''

भिम्या कुंपणावरून खाली आला.

'भिमी' खूष झाली. त्याच्या जवळ गेली.

भिम्यानं गालफडात ठेवलेल्या शेंगा भिमीला दिल्या.

माकडवाला म्हणाला, ''तू नाहीस तर आपला खेळ कसा होणार? दोन दिवस झाले घरात चूल पेटली नाही. हातात एक गिन्नी नाही.''

भिम्यानं जाकीटाच्या खिशातली नोट काढली अन् मालकाच्या हातात दिली. त्याबरोबर माकडवाल्यानं भिम्याला जवळ घेतलं, त्याचा मुका घेत म्हणाला,

''किती गुणी आहे माझा भिम्या...''

त्यावेळी भिमी लाजेनं चूर झाली.

❖ ❖

– विद्याधर म्हैसकर
'यशोधन' ए ३०/१,
कोयना वसाहत, कराड ४१४११०

अरे पावसा पावसा, माझ्या अंगणात पड। तहानलेल्या भुईला, तुझी लागलिया ओढ।।

। **जरूर पाहा... तापळवाडी धबधबा -** उंची ३५० फूट, नेरळ-माथेरान रस्ता (जि. ठाणे)।

प्रायोजक – श्री. शंतनू पटवर्धन, इलिनॉइस, अमेरिका.

शोध कुणाचे... श्रेय कुणाला !

– स्वानंद ऋषि

अनेक शास्त्रीय व इतर शोध अथवा नियम हे विशिष्ट व्यक्तींच्या नावाने आपणास माहीत असतात. त्यामुळे ते शोध त्या व्यक्तीनेच लावलेले असतात, अशी आपली (रास्त) समजूत असते. अर्थात अनेक शोधांच्या बाबतीत ते खरेही आहे. उदा. विद्युतशास्त्रातील ओहमच्या नियमाचा शोध ओहम शास्त्रज्ञानेच लावलेला आहे. तसेच वायूंच्या संबंधित बॉईलचा नियम बॉईल या शास्त्रज्ञानेच शोधला आहे. परंतु असे अनेक नियम वा शोध आहेत ज्यांचा शोध, ते शोध/नियम ज्या व्यक्तीच्या नावाने ओळखले जातात ते त्यांनी शोधलेले नाहीत. तरीही ते शोध त्यांच्या नावानेच सुप्रसिद्ध आहेत!

अशा प्रकारे ‘शोध एकाचा अन् नाव दुसऱ्याचे’ असे अनेक शोधांबद्दल आढळते. अशा शोधांचाही एक नियम तयार झालाय ज्यास ‘स्टिगलरचा नामकरण नियम’ म्हणून ओळखले जाते. शिकागो विद्यापीठातील संख्याशास्त्राचे प्राध्यापक **स्टीफन स्टिगलर** यांनी १९८० मध्ये हा नियम मांडला. तो नियम म्हणजे ‘कोणताही शास्त्रीय शोध हा त्याच्या मूळ संशोधकाच्या नावाने ओळखला जात नाही!’ गंमत म्हणजे स्टिगलर (प्रामाणिकपणे) या नियमाचे जनकत्व रॉबर्ट मर्टन नावाच्या समाजशास्त्रज्ञास देतात! त्यामुळे स्टिगलरचा नियम परत स्वनिर्देशित होतो!

आता **स्टिगलरचा नियम** सिद्ध करणारे काही शोध पाहू.

१. ज्यांना अरेबियन अंक (०-९ आकडे) म्हटले जाते ते भारतीयांनी शोधलेत. अरबी लोकांनी त्यांची ओळख युरोपीय लोकांना करून दिल्याने त्यांना ‘अरबी अंक’ अशी संज्ञा मिळाली. वास्तविक त्यांना ‘भारतीय अंक’ (इंडियन नंबर्स) म्हणावयास हवे.

२. डार्विनचा उत्क्रांतीचा नियम त्याआधी लामार्क, हर्बर्ट, वॅलेस इत्यादींनी मांडला होता व तसा उल्लेख स्वत: डार्विनने त्याच्या 'Origin of Species' या ग्रंथात केला आहे.

३. हॅलेचा धूमकेतू इसवीसनापूर्वीपासून ज्योतिर्विदांना माहीत होता; पण हॅलेने त्याची कक्षा व कालावधी अचूक मांडला.

४. ‘विटस्टोन ब्रिज’ चा शोध सॅम्युएल ख्रिस्तीने १८३३ मध्ये लावला. पण १८४३ मध्ये व्हिटस्टोनने त्यात सुधारणा करून वापरला.

५. ‘पाय’ (π) चा फॉर्म्युला भारतीय गणिती माधवाचार्यांनी १५ व्या शतकात मांडला; पण तो लिबनित्सच्या नावे (१८ वे शतक) गणला जातो.

६. ऑयलर नंबरचा शोध खरे तर जेकब बर्नोली याने लावलाय. तसेच त्याचाच $e^{ix} = \cos x + i.\sin x$ हा फॉर्म्युला त्याचे आधी ३० वर्षे रॉजर कोट्स याने शोधला होता.

७. संख्याशास्त्रातील सुप्रसिद्ध ‘गॉसचे वितरण’ (Gaussian Distribution) मूलत: अब्राहम डी मोइरने १७३३ साली मांडले. गॉसने १७९४ पासून ते वापरले.

वरील उदाहरणांवरून ‘शोध एकाचा, नाव दुसऱ्याचे’ असे का होते याची शास्त्रीय अभ्यासकांनी कारणमिमांसा केली आहे. त्यांचे काही निष्कर्ष असे आहेत–

गडगडले आभाळ, अशी कडाडली वीज। स्तब्ध झाले रानमाळ, सात जन्माची ही भीज॥

। **जरूर पाहा... ताम्हिणी धबधबे -** उंची १०० फूट ते ४५० फूट, ताम्हिणी घाट (जि. पुणे)।

प्रायोजक – मे. सी. व्ही. कांड कन्सलटन्टस् प्रा. लि., पुणे.



१. सर्वसाधारणपणे एखाद्या प्रसिद्ध, प्रस्थापित व मान्यवर व्यक्तीचे नाव शोधाला व नियमाला मिळून जाते. यात 'व्यक्तिप्रामाण्य' या समाजदोषाचा भागही असतो. एखादी गोष्ट 'बाळू' ने सांगितली तर दुर्लक्ष होते पण 'अप्पासाहेबां'नी सांगितली की ते 'वचन' होते!

२. शोधास सर्वदूर प्रसिद्धी देणाऱ्याचे नाव शोधास चिकटते. शोधाचा प्रत्यक्ष उपयोग व प्रभावी वापर करणाऱ्यास त्याचे जनकत्व मिळण्याची शक्यता असते.

३. सर्व क्षेत्रांत प्रादेशिक, राष्ट्रीय व जागतिक संस्था कार्यरत असतात. जोपर्यंत अशा संस्थांची मान्यता मिळत नाही तोपर्यंत मूळ व्यक्ती दुर्लक्षित राहते. उलट त्या व्यक्तीची कल्पना घेऊन प्रभावशाली व्यक्ती या संस्थांमार्फत श्रेय लाटू शकते.

४. एखाद्या बुद्धिमान व्यक्तीचे ती केवळ दुर्गम भागात राहाते म्हणून चीज होणार नाही. त्या व्यक्तीभोवतीचा समाज तितकासा जाणकार व प्रगल्भ नसेल तरी असे होऊ शकते. प्रखर बुद्धिमान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांना प्रा. हार्डी यांनी उदार मनाने पुढे आणले म्हणून त्यांना प्रसिद्धी मिळाली. पण असे अपवाद कमीच.

५. काही व्यक्तींनी लावलेले शोध वा सिद्धांत हे तत्कालीन समाजास पेलवत नाहीत. ते काळाच्या फार पुढे असतात. असे सिद्धांत पुढे योग्य काळी एखाद्या व्यक्तीने स्वत: मांडल्यास त्या व्यक्तीचे नाव होते. 'प्रत्येक कल्पनेची वेळ यावी लागते 'असे म्हणतात ते त्यामुळेच.

६. निसर्ग तसेच व्यक्ती पूर्ण अलिप्तपणे काम करूच शकत नाही. समांतर मांडणी व वाटचाल हा निसर्ग व समाजाचा स्थायीभाव आहे. न्यूटनचे एक वाक्य प्रसिद्ध आहे."We are standing on the shoulders of the Giants, hence we are able to see far and further."

पूर्वीच्या लोकांनी मांडलेल्या कल्पना वा लावलेले शोध पुढील पिढ्यांना मार्गदर्शक ठरतात. एकाचवेळी एखादी कल्पना अनेकांना सुचू शकते; पण वर उहापोह केलेल्या कारणांनी त्यातील एखादाच प्रकाशझोतात येतो. त्यातही रॉबर्ट मर्टनने 'मॅथ्यू परिणाम' सांगताना म्हटल्याप्रमाणे 'प्रस्थापितांना एखाद्या शोधाचे श्रेय मिळण्याची शक्यता अधिक असते'. एखादा शोध त्या व्यक्तीच्या नावे प्रसिद्ध झाला की, त्याचे जनकत्व बदलणे हितसंबंध, राजकारण, अर्थकारण, इ. मुळे अवघड होते.

स्टिगलरचा हा नियम सर्वच शाखांना लागू होतो. अर्थात काही शोधांना मिळालेली चुकीची नावे त्या शास्त्रज्ञांनी स्वत:हून दिलेली नाहीत हेही खरेच. परंतु श्रेयाचा प्रश्न आला की, व्यावसायिक नीतिमत्ता पाळली जातेच असेही नाही. त्यामुळे बहुतेक 'कोणताच शोध त्याच्या मूळ संशोधकाचे नावे ओळखला जात नाही' हे पटते. अनेक व्यक्तींचे शोध प्रसिद्धी अथवा मान्यतेअभावी कालौघात गडप होऊन कदाचित कायमचेच अज्ञात राहतात.

❖ ❖

– स्वानंद ऋषि
क-३, चंद्रीका सोसायटी, ६८६/१ब,
बिबवेवाडी, पुणे ३७.

तुमच्या विज्ञानाच्या पुस्तकातील **शोध-शोधकांच्या माहितीच्या संदर्भात,** त्याविषयीचे मुलभूत संशोधन त्यापूर्वी कुणी केले असेल तर त्या शोधकर्त्याची माहिती मिळवण्याचा प्रयत्न करा!

असा पाऊस पाऊस, वेड्यासम बरसला। झाड वेली, फूल, पक्षी, मनी आनंद फुलला।।

। **जरूर पाहा... दूधसागर धबधबा -** उंची १०२० फूट, गोवा-कर्नाटक सीमेजवळ (राज्य-गोवा)।

प्रायोजक – डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड.

गटात निर्णय घेताना...

लेखांक – ७

– महेन्द्र सेठिया

स्वत:च्या वैयक्तिक गोष्टींबाबतचे निर्णय स्वत:चे स्वत: घ्यायला कसे शिकायचे हे यापूर्वीच्या अनेक लेखांमध्ये तुम्ही समजून घेतले असेल. त्यातून निर्णय घेणं, घेतलेल्या निर्णयाचं विश्लेषण करणं, त्यातून शिकून अधिक चांगले निर्णय घेणं हेही तुम्हाला जमायला लागले असेल. पण आपल्याला फक्त स्वत:पुरते, स्वत:साठी निर्णय घ्यावे लागत नाहीत तर अनेकवेळा आपण एका गटाचे भाग असतो. तेव्हा आपल्याला गटासाठी निर्णय घ्यायचा असतो. कधी आपण त्या गटाचे एक सदस्य असतो तर कधी त्या गटाच्या प्रमुखाची, नेत्याची जबाबदारी आपल्याकडे असते. अशावेळी निर्णय घेणं अजून अवघड असतं. कारण गटातल्या प्रत्येक सदस्याची वेगवेगळी मतं असतात. त्या सर्वांचा विचार करून सगळ्यांना रुचेल, भावेल आणि योग्य असेल असा निर्णय घेणं ही विशेष कसरत असते. ही कसरत कशी जमवायची आणि गटाने मिळून स्वावलंबनाने, जबाबदारीने योग्य निर्णय कसे घ्यायचे हे आपण समजून घेऊया. त्यासाठी आधी आपण गटातल्या निर्णयाची प्रक्रिया कशी घडते ते पाहूया.

कोणकोणत्या प्रसंगात तुम्हाला गटात निर्णय घ्यावे लागतात? उदाहरणार्थ –

१. तुमच्या गटाला मिळून एक हस्तलिखित तयार करायचंय, त्यात काय असावं हे गटाने मिळून ठरवायचंय.

२. वर्ग सजावटीची स्पर्धा आहे आणि काय काय करायचं ते वर्गाने मिळून ठरवायचंय.

३. यावर्षीच्या १५ ऑगस्टच्या कार्यक्रमाची जबाबदारी तुमच्या गटाकडे दिली आहे; त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कोणाला बोलवायचं; कोणता कार्यक्रम करायचा हे गटाने ठरवायचंय!

४. मित्रांचा गट एकत्र जमलाय आणि एखाद्या रविवारी सगळ्यांनी मिळून छोट्या सहलीला जायचं आहे; कुठे–कसं ते सर्वांनी मिळून ठरवायचंय.

५. तुम्ही सगळी भावंडं एकत्र जमलात आणि सगळ्यांनी मिळून काय खेळायचं ते ठरवायचंय.

६. क्रीडा स्पर्धेच्या वेळी तुमचे क्रीडा मार्गदर्शक अनुपस्थित आहेत आणि तुम्हाला गटाला मिळूनच समोरच्या संघाविरुद्ध कसं खेळायचं ते ठरवायचं आहे.

अशा अजून कोणकोणत्या प्रसंगी तुम्हाला गटात काही ठरवायला लागतं? काही निर्णय घ्यावे लागतात? आठवून यादी कराल?

गटातील सदस्य 'निर्णयातील स्वावलंबन' शिकलेले नसतील तर ते मोठ्या कोणाकडून तरी निर्णय येण्याची वाट पाहतात. आमच्या वर्गशिक्षिका सांगतील काय करायचं ते! आमच्या मुख्याध्यापकांनी जे ठरवलं असेल त्याप्रमाणे आम्ही करू, त्यांनाच ठरवू दे! अशाप्रकारे ते निर्णय मोठ्यांवर सोपवून देतात. खरं तर, आई–बाबा, ताई–दादा, शिक्षक यांची मदत, मान्यता जरूर घ्यावी; पण त्याआधी **गटाने मिळून, एकत्र विचार करून काही पर्याय काढायला हवेत. त्यातला तुम्हाला सर्वात योग्य पर्याय कोणता वाटतो व तो सर्वात योग्य का वाटतो हे तुम्हाला सांगता यायला हवं.** असं करता आलं म्हणजे गटाचा निर्णयातल्या स्वावलंबनाच्या दिशेने प्रवास सुरु झाला, असं म्हणता येईल.

जरा आठवा बघू गटात जेव्हा तुम्ही काही ठरवायचा प्रयत्न करता तेव्हा काय काय घडतं? काही जण आपल्याला जे सुचेल ते सांगत असतात. उदा. वर्गसजावटीच्या बाबतीत...
फळ्यावर 'सुविचार' लिहूयात अशी कल्पना एखादा मांडतो, तर एखादा 'मी फुलं आणीन' असं सांगतो. अजून एखादा 'आदल्या दिवशीच सगळं तयार पाहिजे', असं सांगतो. एखादा मात्र 'मागच्या वर्षी

भरलेले ओढे नाले, नदी हासते मोकळी। पानातून डोकावते, चिंब भिजलेली कळी।।

। **जरूर पाहा... जोग धबधबा -** उंची ८३० फूट, शिमोगाजवळ (राज्य-कर्नाटक)।

पाचवी ते नववीसाठी मानसपट मापन - ज्ञान प्रबोधिनी द्वारा प्रज्ञा मानस संशोधिका, पुणे ☎ ०२०-२४२०७१४५



दुसऱ्या वर्गाचा क्रमांक कसा पहिला आला, त्यात पार्सलिटी कशी झाली' याची गोष्टच सांगायला सुरुवात करतो. 'सर्वांनी मिळून दहा-दहा रुपये काढायचे', असं कोणी सुचवतो. तर 'माझे बाबा देणार नाहीत' असं लगेच कोणी प्रतिक्रिया देतो. अर्धा पाऊणतास नुसता कलकलाट होतो. काहीजण आपापसात बोलत बसतात तर काही जण एकदम गप्प असतात. शेवटी काहीच न ठरता/ठरवता वेळ संपते. मग १-२ जणच परस्पर ठरवून मोकळे होतात. दुसऱ्या दिवशी 'आपण काल ठरवल्यानुसार' असं म्हणून ते स्वत: घेतलेला निर्णय गटाचा म्हणून सांगून टाकतात. मग काही जण म्हणतात, 'हे आपण केव्हा ठरवलं?' घडतं ना अगदी असंच? म्हणजे गटात सर्वांनी मिळून योग्य निर्णय घ्यायचा असेल तर दोन गोष्टी खूप महत्त्वाच्या आहेत. पहिली गोष्ट **गटात योग्य रीतीने चर्चा करण्याचं कौशल्य सर्वांनी आत्मसात करायला हवं**. आणि दुसरी गोष्ट **आपल्याला कशाकशाचे निर्णय घ्यायचे आहेत त्याची यादी करून टप्प्याटप्प्याने एकेका निर्णयासाठी आवश्यक प्रक्रिया करत, विविध पायऱ्या पूर्ण करत जायला हवं.**

गटचर्चा कौशल्याबाबत फार तपशिलात येथे लिहीत नाही. पण थोडक्यात सांगायचं तर चर्चेमध्ये गटातल्या सर्वांचा सहभाग असावा. एखादाच खूप बोलतोय आणि एखादा अजिबात बोलत नाहीये, असे होता कामा नये. एखाद्याच्या कल्पनेला लगेच विरोध करू नये. त्यातलं काय योग्य वाटतंय, चांगलं वाटतंय हे आधी सांगून मग त्यातली उणीव सांगण्याचा प्रयत्न प्रत्येकाने करावा. विरोध कल्पनेला करावा, व्यक्तीला नाही. निर्णय घेण्यासाठी प्रत्येकाने उपयुक्त माहिती पुरवावी, प्रश्न विचारावेत, स्पष्टता आणावी. एकावेळी एकाने हात वर करून मगच बोलावे. विषयाला धरून मुद्देसूद आणि नेमके बोलावे . छोट्या छोट्या उपगटांमध्ये चर्चा करू नये किंवा कॉमेंट करू नयेत. गटाला प्रमुख असावा व त्यानेच चर्चा नियंत्रित करावी.

गटात निर्णय करण्यासाठी गटचर्चा कौशल्याचा सराव खूप महत्त्वाचा आहे; नाहीतर चर्चा खूप भरकटत जाते, फिसकटते, गट फुटतो आणि शेवटी काहीच ठोस ठरत नाही.

दुसरी गोष्ट कशाकशाचे निर्णय घ्यायचे हे ठरवणे व एकावेळी एकेका गोष्टीचा निर्णय घेत जाणे, हे महत्त्वाचे असते. **उदा. 'वर्ग सजावट'** या विषयाबाबत कोणकोणते निर्णय घ्यायचे आहेत?

- काय-काय करायचे? • कोणी-कोणी करायचे?
- केव्हा करायचे? • कसे करायचे?
- कोणती साधने, पैसा, वेळ उपलब्ध होणार आहे?

मग यातला एकेक मुद्दा चर्चेला घ्यावा. सुरुवात कशाने कराल? 'कोणी-केव्हा करायचे', या मुद्द्यानी कराल, की 'काय-काय करायचे' याने कराल? अर्थातच 'काय काय करायचे?'; पण त्याआधी गटातील सर्वांना स्पर्धेचे स्वरूप, अटी, नियम, परीक्षणाचे निकष इ. गोष्टी माहिती हव्यात.

व्यक्तिगत निर्णय घेताना ज्या पायऱ्यांचा उपयोग करावा लागतो त्याच पायऱ्या गटातील निर्णयासाठीही वापराव्या लागतात. काही पायऱ्यांवर अधिक चर्चा होईल तर काहींच्या बाबतीत पटकन पुढे जाल. **वर्ग सजावटीसाठी काय काय करायचे** याबाबत निर्णय घेताना **कोणत्या पायऱ्या वापराल?**

१. निकष पक्के करा – कोणत्या निकषांच्या आधारे तुम्ही निर्णय घेणार? **उदा.**

१. जमा-खर्चाचा अंदाज – प्रत्येक विद्यार्थ्यांकडून १० रुपये जमा करायचे ठरवले अन् वर्गात ६० विद्यार्थी असतील तर साधारणपणे ५०० ते ६०० रुपये जमा होतील. मग जो पर्याय निवडणार ते या रकमेच्या आतील खर्चाचे लागतील.

२. सर्वांचा सहभाग – जे ठरवू ते बाजारातून

कोठे शोधू पायवाटा, वाटा वाहुनिया गेल्या। पावसाचा थेंब थेंब, मनी साठवून गेल्या।।

। **जरूर पाहा... नोहकालीकाई धबधबा -** उंची १०९९ फूट, पूर्व खासीहिल्सजवळ (राज्य-मेघालय)।

पदवीपूर्व/पदव्युत्तर करिअर समुपदेशन - प्रज्ञा मानस संशोधिका , ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

आणायचे नाही; आपणच तयार करायचे. त्यात प्रत्येकाला सहभागी होता आलं पाहिजे.

३. नवीन कल्पना असायला पाहिजे. यात तुम्ही काही निकषांची भरही घालू शकता.

२. **निकषांचा प्राधान्यक्रम ठरवा –** जो निकष सर्वात महत्त्वाचा आहे असं तुम्हाला वाटतं त्याला सर्वात जास्त प्राधान्य मिळेल. उदा. नवीन कल्पना हा पहिल्या प्राधान्याचा निकष घेतला तर त्यानुसार निवड करताना तुम्हाला विचार करावा लागेल.

३. **पर्याय शोधा व त्यांची निकषांच्या आधारे तुलना करा –** आता काय–काय करता येईल याचा निर्णय करायचा असेल तर प्रथम त्याविषयी भरपूर कल्पना काढा. त्यातल्या सर्वात नवीन कल्पना कोणत्या, कोणत्या पर्यायांमध्ये अधिकाधिक जणांना सहभागी होता येईल? आपल्या बजेटमध्ये कोणते पर्याय बसतील? अशा आधारे पर्यायांची तुलना करा. हे करताना निकष महत्त्वाचे, कल्पना कोणी सुचविली हे महत्त्वाचे असता कामा नये.

४. **उपलब्ध पर्यायांपैकी सर्वोत्तम निवडा** – साधन सामग्रीच्या मर्यादा आणि स्पर्धेत जिंकण्याचा हेतू लक्षात घेऊन सर्वोत्तम पर्यायांची निवड करा. ही सर्वात अवघड पायरी असते. कारण गटात निवड करताना अनेक मते–मतांतरे, व्यक्तीच्या भावभावना यांचे अडथळे पार करत, ही निवड करायची असते. **त्यासाठी सक्षम नेता आवश्यक असतो. त्याने सर्वांना मते मांडायची संधी दिली पाहिजे. सर्वांचे ऐकून घेऊन त्यातून योग्य पर्यायाची निवड करणे व ती निवड का केली हे सर्वांना समजावून सांगितल्यावरच निर्णय अंतिम करायचा असतो.**

५. **प्रतिकूल परिणामांचा विचार –** पर्यायांची निश्चिती केल्यावर विचार करायचा असतो ते प्रतिकूल परिणामांचा! ठरल्याप्रमाणे वर्गातील सर्वांनी सहकार्य केलेच नाही किंवा वीजेवर चालणारे सुशोभन करायचे प्रामुख्याने ठरवले आणि अचानक स्पर्धेच्या दिवशी

वीजच गेली तर..., भिंतीवर चिकटवताना भिंती खराब झाल्याबद्दल दंड/शिक्षा झाली तर?... ठरल्याप्रमाणे काही कामे केली तर काय–काय अडचणी येऊ शकतील. किंवा काय काय परिणाम होऊ शकतील याचा विचार करणेही महत्त्वाचे असते.

६. **पर्यायी नियोजन –** प्रतिकूल परिस्थिती व परिणामांच्या बाबतीत उपाययोजना किंवा पर्यायी नियोजन करून ठेवण्याचाही विचार करून ठेवावा लागेल. वीज नसेल तर बॅटरीचा पर्याय वापरता येईल का? चिकटवण्याऐवजी, तक्ते भिंतीवर टांगता येतील का? किंवा दोन्ही बाजूंना चिकटवण्यासाठी असलेली चिकटपट्टी वापरता येईल का? किंवा वर्गशिक्षकांची परवानगी मिळवता येईल का? वर्गातल्या सर्वांचा सहभाग मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांचे छोटे–छोटे गट करून त्या गटांना वेगवगळ्या जबाबदाऱ्या देता येतील का?

७. **निर्णयाची अंमलबजावणी –** या सर्व पायऱ्यांमधून निर्णय व पर्यायी उपाययोजना निश्चित केल्यावर मग निर्णयाची अंमलबजावणी करायला सुरुवात करा. त्यासाठी तुम्हाला नियोजन कौशल्ये वापरावी लागतील. कोणी, केव्हा, कसे? या प्रश्नांचे निर्णय त्या टप्प्याला छोट्या छोट्या गटातही घेता येतील. हे वाचताना खूप सोप्पं वाटत असेल; पण प्रत्यक्ष गटात या प्रत्येक पायरीवर चर्चा करताना अनेक फाटे फुटतील.

रान हिरवं हिरवं, पायवाटा मुक्त मुक्त। पावसाची रीत अशी, चिंब चिंब आसमंत।।

। जरूर पाहा... अथीरापिल्ली धबधबा - उंची ८० फूट, त्रिसूर फॉरेस्ट डिव्हिजनजवळ, कोचीन (राज्य-केरळ)।

राष्ट्रीय प्रश्नांवर मासिक व्याख्यानमाला - जनतंत्र उद्‌बोधन मंच, संत्रिका ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१८७

पण तरी सर्वांच्या चर्चेतून निर्णय व्हायला हवा. सर्वांचा सहभाग न घेता १-२ जणांनीच गटासाठी निर्णय घेतले तर इतरांचा सहभाग खूप मर्यादित राहील. किंवा प्रसंगी काहींचा विरोधही होईल; म्हणून या सर्व प्रक्रियेत गटातील सर्व सदस्यांना सहभागी करून घेतले, तर तो निर्णय 'आपला' आहे असे सर्वांना वाटेल व त्याची अंमलबजावणी मोठ्या उत्साहाने होईल.

निर्णय घेताना होणारी सर्वात मोठी चूक म्हणजे दुसऱ्याने दिलेल्या सल्ल्याची 'स्वत: विचार न करता' अंमलबजावणी करणे. कधी दुसऱ्यांच्या प्रभावाखाली तर कधी फक्त मित्रांच्या मताचा विचार करून निर्णय घेतले जातात. बरेच जण स्वत: विचार न करता दुसऱ्यांनी सांगितलं, दुसऱ्यांच्या प्रभावापोटी, मैत्रीपोटी, भावनेपोटी निर्णय घेतात. निर्णय प्रक्रियेतला हा मोठ्ठा दोष आहे; हे कायम लक्षात ठेवा. दुसऱ्यांचं मत जरूर ऐका पण त्यावर स्वत: विचार करा. प्रश्न विचारून तुम्ही स्पष्टता आणून घ्या. संभाव्य अडचणी वा अयोग्य परिणाम जर आपल्या लक्षात आले असतील तर गप्प बसू नका. ते गटात सर्वांना मोकळेपणी सांगा. आपण घेत असलेला निर्णय सर्व गटाचा असतो; आपल्या एकट्याचा नसतो. त्यामुळे 'आपल्याला सगळं कळतं', असा गैरसमज गटातल्या कोणीच करून घेऊ नये.

हे करताना सर्वात मोठा अडथळा असतो तो गटातील सदस्यांमध्ये असलेल्या स्वभावातील काही दोषांचा! ते आपण पुढच्या लेखात समजून घेऊया. तोपर्यंत गटात छोटे-मोठे निर्णय घ्यायला तुम्ही सुरुवात करा. त्यासाठी वर सुचवलेली शास्त्रीय पद्धत वापरून पाहा. त्यातील अडचणी, अडथळे आमच्यापर्यंत जरूर पोहोचवा. यापूर्वी गटात घेतलेल्या निर्णयांचं विश्लेषण करून पाहा. त्यातून आजच्यापेक्षा उद्या तुम्ही गटात मिळून अधिक चांगले निर्णय घ्यायला सक्षम व्हाल!

❖ ❖

- महेन्द्र सेठिया
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०

* अभिनंदन *

'छात्र प्रबोधन' तर्फे अनुभवसंपन्न आणि आनंददायी सुट्टीसाठी व्यक्तीकार्य या उपक्रमाचे आवाहन सौर चैत्र व वैशाख शके १९३५ (एप्रिल, मे २०१३) च्या अंकात प्रसिद्ध केले होते. त्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपला सभासद **चि. श्रीराज दत्तात्रय मंडलिक** (मिरज) याने यशस्वीरित्या **२० कामे पूर्ण केली.** त्याला बक्षीस म्हणून 'छात्र प्रबोधन'ची **वार्षिक वर्गणी तीन महिने वाढवून दिली आहे.** त्याचे हार्दिक अभिनंदन!!

'छात्र प्रबोधन'च्या **सौर ज्येष्ठ, शके १९३५ (जून २०१३)** या अंकात **संकल्प तक्ता** दिला होता. शालेय वर्षाच्या सुरुवातीस जाणीवपूर्वक काही संकल्प करावेत हा त्यामागचा उद्देश होता.

चि. कौशिक कुलकर्णी, पंढरपूर (इ. ९ वी) या विद्यार्थ्याने आम्ही केलेल्या आवाहनास प्रतिसाद देऊन संकल्प तक्ता भरून पाठविला आहे. ते संकल्प पूर्ण होण्यासाठी त्याला खूप शुभेच्छा!

मिळवा या प्रश्नांची उत्तरे

१. कॅरेट म्हणजे काय? २४ कॅरेट सोने म्हणजे काय?
२. ५ रु. च्या नोटेवर त्या नोटेची किंमत कोणकोणत्या भाषांमधून लिहिलेली असते, ते क्रमानुसार लिहून पाठवा. तसेच तोच मजकूर देवनागरी लिपीत त्याच क्रमाने लिहून पाठवा.
३. 'पदार्थ शिजतो' म्हणजे नेमके काय होते?
४. आपल्या बोटांना जखम झाली तरी बोटांचे ठसे बदलत का नाहीत?
५. 'ऑरोरा' हा प्रकाशाचा एक अद्‌भूत खेळ आहे. हा पृथ्वीवरील कोणत्या भागात दिसतो आणि त्याचे स्वरूप काय असते?
६. गुळगुळीत कागद पाण्यात बुडवून नंतर वाळवला तर त्याला सुरकुत्या का पडतात?

असा पाऊस पाऊस, लाडे लाडे बरसला। धरित्रीच्या गालावर, हसू फुलवून गेला।।

। **जरूर पाहा... धुँवाधार धबधबा -** उंची ९८ फूट, भेडाघाटजवळ, जबलपूर (राज्य-मध्यप्रदेश)।

'उमलत्या' वयाशी जुळवून घेताना (लैंगिकता शिक्षण व जाणीव संवर्धन) - संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

रानमाळ फुललेले, बहरला शेतमळा। माझ्या शिवारी आला, आज आनंद सावळा।।

। **जरूर पाहा... भागसू धबधबा -** उंची ७११२ फूट, भागसू देवळाजवळ, मॅकडॉवेलगंज (राज्य-हिमाचल प्रदेश)।

सहभागी व्हा ! मुलींसाठी - क्रीडा दले, विज्ञान दल - युवती विभाग, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - मेधाविनी ☎ ९४२३१६२१३४

बुद्धीला खुराक

(१) एका सुताराजवळ ७ लाकडी फळ्या आहेत. त्यांपैकी ४ फळ्या प्रत्येकी ४×१' या मापाच्या आहेत आणि ३ फळ्या '३×१' या मापाच्या आहेत. या फळ्या न कापता अशा प्रकारे जोडून दाखवा की त्यांपासून एक चौरस तयार होईल.



(२) खालील आकृतीत दोन रांगांमध्ये चकत्या असून समोरासमोरील चकत्या जोडलेल्या आहेत. चकत्यांवर ज्या संख्या लिहिल्या आहेत, त्यांची प्रत्येक रांगेतील बेरीज २८ आहे. यांपैकी तीन जोड्या रांगेतून बाजूला काढा की ज्यामुळे प्रत्येक रांगेत उरलेल्या चकत्यांवरील संख्यांची बेरीज १४ होईल.



(३) शेजारील आकृतीत एकूण २५ वर्तुळे आहेत. यांपैकी अशा फक्त ५ वर्तुळांना रंग द्या की त्यामुळे या आकृतीचे एकाच प्रकारचे पाच समान भाग होतील.



(४) वरील ९ चौकटींमध्ये १ ते ९ हे अंक अशा प्रकारे लिहा की प्रत्येक ओळीमध्ये एक वर्गसंख्या तयार होईल. एक अंक एकदाच वापरावयाचा. एकूण चार वर्ग संख्या तयार होतील.



(उत्तर अन्यत्र)

– डॉ. वा. ना. दांडेकर, पुणे ४

(पुर्नमुद्रण – सौर कातिक, शके १९२२/ऑक्टोबर २०००)



✲ श्रद्धांजली ✲

'ज्ञान प्रबोधिनी'चे ज्येष्ठ कार्यकर्ते **डॉ. विवेकानंद उर्फ भाई फडके** यांना ७ जुलै २०१३ रोजी दीर्घ आजाराने देवाज्ञा झाली. हे 'ज्ञान प्रबोधिनी' प्रशालेच्या पहिल्या तुकडीचे विद्यार्थी व प्रबोधिनीचे बिनीचे प्रतिज्ञित कार्यकर्ते! तेरा वर्षे त्यांनी प्रबोधिनीचे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या. क्रीडा दले, विविध शिबिरे, सहली, गणेशोत्सव, विक्री उपक्रम, अभ्यास दौरे, मदत कार्य, समाज ऐक्य समिती यांद्वारा प्रबोधिनीच्या युवक संघटनेच्या पायाभरणीचे काम त्यांनी केले. पंजाब–हरयाणा–दिल्ली येथे प्रबोधिनीच्या व्यापार उद्योग विभागाचे दायित्व त्यांनी सक्षमपणे सांभाळले. 'ज्ञान प्रबोधिनी आयुर्विज्ञान संस्थे'च्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. डोंबिवलीतील 'पेंढारकर महाविद्यालया'त सात वर्षे व नंतर पुण्यातील 'फर्ग्युसन महाविद्यालया'त जून २०१३ पर्यंत इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले भाई अत्यंत विद्यार्थिप्रिय होते. 'छात्र प्रबोधन'च्या सर्व इंग्रजी दिवाळी अंकांसाठी गुणवत्तापूर्ण संपादक मंडळ जोडून देण्याचे काम सातत्याने त्यांनी केले व म्हणूनच दरवर्षी दर्जेदार इंग्रजी दिवाळी अंक आपण प्रकाशित करू शकलो. रसिकता आणि भावनोत्कटता, प्रखर मातृभक्ती, सतत इतरांसाठी झटण्याची वृत्ती, प्रसिद्धी पराङ्‌मुखता, संघटन कुशलता, इंग्रजी व जर्मन भाषेवर प्रभुत्व, राष्ट्रीय एकात्मतेसाठी कृतिशील अस्वस्थता, तत्त्वज्ञानांचा व सद्यपरिस्थितीचा गाढा अभ्यास व चिंतन अशी विलक्षण गुणसंपदा असलेल्या प्रबोधिनीच्या या ज्येष्ठ कार्यकर्त्याला 'छात्र प्रबोधन'तर्फे विनम्र, भावपूर्ण श्रद्धांजली.

बैल रानी हुंदडतो, गाय मुकाट चरते। पावसाची सर येता, रोम रोम उमलते।।

। **जरूर पाहा... ॲबी धबधबा -** उंची ७० फूट, मेडिकेरी, कुर्ग (राज्य-कर्नाटक)।

७वी ते ९वीच्या मुलामुलींसाठी- सामूहिक विद्याव्रत संस्कार - संत्रिका व संवादिनी, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७२२२

मंतरणारे शब्द !!

गणेश राऊत

कोणत्याही देशाचा इतिहास पाहिला तर पारतंत्र्याच्या भयाण अंधारात एखाद्या नेत्याचे प्रेरणादायी शब्द सूर्याचे तेज घेऊन येतात, असे दिसते.
अवघ्या देशातील वातावरण त्या शब्दांनी भारावून जाते. सामान्य माणसांना अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा, शक्ती असे शब्द देऊन जातात.
स्वांतत्र्यदिनाच्या निमित्ताने भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील अशा काही प्रेरक वचनांचे हे स्मरण!!

भारताच्या इतिहासात आचार्य, राजे, महाराजे यांची प्रेरणादायी वचने तर अगदी आधुनिक काळात स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांची भावनिक आवाहने खूप मोलाची आहेत. नेत्याच्या एखाद्या वाक्यानेसुद्धा 'इतिहास' घडल्याची अनेक उदाहरणे आपल्याला दिसतात.

प्राचीन भारतात आचार्य चाणक्य यांचे **'नंदकुलाचा नाश केल्याखेरीज शेंडीला गाठ मारणार नाही'**, हे विधान ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असेच आहे. या महत्त्वाकांक्षेतून भारतातील पहिले एकछत्री साम्राज्य उभे राहिले. याची सत्यता आपणाला नंतरच्या घटनाक्रमातून पटते.

मध्ययुगीन कालखंडातील थोरले बाजीराव पेशवे यांचे दिल्लीच्या बादशाहीच्या संदर्भातील **'झाडाच्या मुळ्या कापल्या की फांद्या आपोआप खाली येतील'**, या आशयाचे केलेले विधान महत्त्वाचे ठरले. **'वसईचा किल्ला जिंकता येत नसेल तर मला तोफेच्या तोंडी द्या म्हणजे माझे शरीर तरी किल्ल्यात जाऊन पडेल'**, या आशयाचे उद्‌गार काढणारे तडफदार चिमाजीअप्पा असोत की **'आधी लगीन कोंढाण्याचे'** असं म्हणणाऱ्या तानाजीचे बोल इतिहासात अजरामर झाले. तानाजीच्या बलिदानानंतर येसाजीने सर्व मावळ्यांना उद्देशून म्हटले होते, 'तुमचा बाप तिथे मरून पडला असताना, असे पळून काय जाताय? परतीचे दोर मी केव्हाच कापले आहेत.' याचा संदर्भ घेऊन आचार्य विनोबा भावे **'आयुष्यातले मागील दोर कापल्याशिवाय पुढे जाता येणार नाही'**, असे जेव्हा म्हणतात तेव्हा विनोबांचे मोठेपण पटते. **'मेरी झाँसी नही दूँगी'**, **'वंदे मातरम्'**, **'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे'**, **'इन्कलाब झिंदाबाद'**, **'तुम मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूँगा'**, ह्या सगळ्या वाक्यांनी इतिहास घडविला आहे. जनमानसाचा तळ ढवळून काढण्याची ताकद या आवाहनात होती. ही आवाहने ज्या व्यक्तींनी केली त्यांच्याबद्दल लोकांमध्ये अतीव आदर, विश्वास होता. म्हणून त्यांच्या एका आवाहनात क्रांतीचे स्फुलिंग चेतवण्याची ताकद होती. या सगळ्यावर कळस चढविला तो महात्मा गांधी यांनी! **'चले जाव'** आणि **'करेंगे या मरेंगे'** या त्यांच्या उद्‌गारांनी लक्षावधी लोक प्राणांचे बलिदान देण्यास तयार झाली.

या लेखात आपण मोजक्याच उद्‌गारांचा आढावा घेणार आहोत. विद्यार्थी आणि युवकांचा एक आदर्श म्हणजे **क्रांतिशिरोमणी भगतसिंह** ! सध्याच्या पाकिस्तानमधील लाहोरजवळील बांगा खेड्यात किसनसिंग या क्रांतिकारक शेतकऱ्याच्या पोटी भगतसिंह यांचा जन्म झाला. बंडखोरी आणि अन्यायाविरुद्ध लढण्याचे संस्कार घरातूनच झालेले असल्यामुळे भगतसिंह यांनी घेतला वसा टाकला नाही. गावातील प्राथमिक शिक्षण संपताच दयानंद अँग्लो वैदिक शाळेत त्यांचा प्रवेश झाला. या शाळेत शिक्षण घेत असतानाच त्यांच्यातील क्रांतिकारक आकाराला आला.

जालियनवाला बाग हत्याकांड प्रकरण घडले तेव्हा शाळकरी वयातला हा मुलगा त्या स्थानाला भेट द्यायला निघाला. भगतसिंहाने एकट्यानेच या स्थानाला भेट दिली. तेथील मूठभर माती पुरचुंडीत बांधून आणली. घरात ठेवलेल्या त्या पुरचुंडीचे रोज दर्शन घेऊन शाळेत जाणे त्याने सुरू केले. या शाळकरी मुलाच्या कानावर पंजाबमधील तप्त वातावरण येतच होते. घरात वडिलधाऱ्यांची चर्चा चालायची. रौलेट ॲक्टला विरोध

मनी आनंद-आनंद, मेघ ओसंडून येतो। धरतीच्या भाळावर, सुख गोंदुनिया जातो।।

। **जरूर पाहा... शिवसमुद्र धबधबा -** उंची ३२२ फूट, म्हैसूर (राज्य-कर्नाटक)।

NTS मार्गदर्शन, विविध कौशल्यांचे प्रशिक्षण - बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१९४

करण्याची भूमिका सर्वत्र होती. पण अत्यंत उद्दाम असणाऱ्या जनरल डायरला ब्रिटिश शासनाने गौरविले होते. त्याला बक्षिसी देण्यात आली.

इंग्रजांच्या विरोधात आपण काहीतरी केले पाहिजे असे सारखे भगतसिंहांना वाटतच होते; पण नक्की काय करावे याचा निर्णय होत नव्हता. सगळीकडून वाफ कोंडून एकत्र झाली होती. असंतोषाचा स्फोट होण्याचेच तेवढे बाकी होते. अशातच एक संधी चालून आली.

महात्मा गांधी यांनी या काळातच देशभरात असहकाराची चळवळ सुरू केली. सरकारी नोकऱ्या, कोर्ट-कचेऱ्या, शाळा, कॉलेज सोडून लोक असहकार आंदोलन यशस्वी करण्यासाठी लोक झटू लागले. सरकारशी संबंधित असणाऱ्या सर्वच विभागांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन करण्यात आले. या सगळ्यांचा परिणाम म्हणून भगतसिंह यांनी शाळा सोडण्याचा निर्णय घेतला. गांधीजींचे असहकार चळवळीचे आवाहन आणि स्वत:च्या अंतरात्म्याची हाक यांच्याशी प्रामाणिक राहण्याचे त्यांनी ठरविले. वर्गातल्या सहकाऱ्यांनी, मित्रांनी, शिक्षकांनी या हुशार विद्यार्थ्याला वेड्यात काढले. एवढा हुशार मुलगा असा निर्णय कसा घेतो याचे आश्चर्य सगळ्यांना वाटू लागले. भगतसिंहानी शाळा सोडली. त्यांनी क्रांतिकार्यात सहभागी होण्याचा निर्णय घेतला.

'हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' संस्थेच्या माध्यमातून जनतेत जाणीव जागृती करण्याचे प्रयत्न सुरू झाले. स्वतंत्र भारत हे समाजवादी प्रजासत्ताक राज्य असेल ही संकल्पना त्यांनी मांडली. डॉन ब्रिन या आयरिश क्रांतिकारकाच्या आत्मकथनाचा त्यांनी हिंदीत अनुवाद केला. पुढे लाला लजपतराय यांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्या सॉण्डर्स या इंग्रज अधिकाऱ्यावर त्यांनी गोळ्या झाडल्या. बॉम्ब तयार करण्याचे प्रशिक्षण भगतसिंहांनी घेतले. आपली तात्त्विक भूमिका जगासमोर मांडण्यासाठी त्यांनी एक अभूतपूर्व कृत्य करण्याचे ठरविले.

केंद्रीय कायदेमंडळात 'पब्लिक सेफ्टी बिल' आणि 'ट्रेड डिस्प्यूट बिल' या विधेयकांच्या माध्यमातून सरकार नागरी स्वातंत्र्यावर आणि कामगार वर्गावर बंधने आणण्याचा विचार करीत होती. विधेयक चर्चेला यायच्या दिवशी ८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंह आणि बटुकेश्वर दत्त यांनी सभागृहात बाँब टाकले. सर्वत्र धावपळ उडाली. दोन तरुण **'क्रांती चिरायू होवो'**, **'साम्राज्यवादाचा नायनाट होवो'**, **'जगातील कामकऱ्यांनो संघटित व्हा'**, अशा घोषणा देऊ लागले. **'बहिऱ्या लोकांना कानठळ्या बसविणारा मोठा आवाजच फक्त ऐकू जातो'**, या फ्रेंच क्रांतिकारक व्हीलंटच्या विधानाचा त्यांनी पुरस्कार करत परत स्वत:ला अटक करून घेतली.

बॉम्बस्फोटाविरुद्ध कोर्टात खटला उभा राहिला. इ. स. १९३१ मध्ये भगतसिंह, सुखदेव, राजगुरू यांना फाशीची शिक्षा देण्यात आली. तिघांनीही **'इन्कलाब झिंदाबाद'** घोषणा देऊन वीरमरण पत्करले.

मागचा पुढचा विचार न करता आपल्या नेत्याच्या प्रेरणादायी शब्दांखातर स्वातंत्र्यलढ्यात भगतसिंहांसारखे आपल्या प्राणाचे बलिदान दिलेले अनेक अज्ञात 'अनामवीर' इतिहासात होऊन गेले. त्या सगळ्यांनाच या निमित्ताने मनापासून सलाम!! ❖❖

– गणेश राऊत
१०१, अमरपुरी सह. गृह. संस्था,
३८/२ मधुबन कॉलनी, कर्वेनगर पुणे ५२

आवर्जून करा !

मित्रांनो, वरील लेखात उल्लेख केलेल्या वचनांसारखी इतिहास घडवणारी अशी काही वचने तुम्ही शोधा. त्या वचनांमागचा प्रेरक इतिहास तुम्ही जाणून घ्या. ती माहिती तुमच्या शब्दांत लिहून 'छात्र प्रबोधन'कडे पाठवायला विसरू नका.

अरे पावसा पावसा, कुठे लपलास राजा। वाट पाही रान-माळ, सोड लपंडाव तुझा ।।

। **जरूर पाहा... खंडधर धबधबा -** उंची ८०१ फूट, जि. सुंदरगड (राज्य-कर्नाटक)।

UPSC परीक्षा पूर्वतयारी वर्ग - स्पर्धा परीक्षा केंद्र, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१४४

मुलांचे पान

मी ट्रेकिंग सॅक बोलतेय!

– चि. स्वराज पाटील

स्वराज सुट्टीत घरी येऊन एक महिना झाला होता. तो दररोज माझ्यातून लॅपटॉप काढून त्यावर विविध खेळ, मनोरंजन, इंटरनेट बघून माझ्यात लॅपटॉप ठेवून मला जागेवर ठेवून देत असे. पण गेल्या तीन-चार दिवसांपासून 'ज्ञान प्रबोधिनी'च्या सहलीच्या गप्पा त्याच्या तोंडून ऐकू येत होत्या. तेव्हा मला देखील या सहलीला जायला मिळेल असे वाटले नव्हते. परंतु ३० मे रोजी स्वराजने मला पूर्णपणे खाली केले आणि गिरिभ्रमणासाठी आवश्यक साहित्य माझ्यात भरायला सुरुवात केली. त्याचवेळी माझ्याही मनात आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या.

स्वराजबरोबर त्याचा जळगावचा 'संवाद' नावाचा मित्रदेखील या गिरिभ्रमणासाठी आला आणि त्याचीही बॅग या प्रवासात माझी मैत्रीण झाली.

३१ मे रोजी संवादची बॅग, मी (स्वराजची बॅग) आणि त्यांचा धुळ्याचा मित्र 'अथर्व'ची बॅग अशा आम्ही तिघी बॅगा एस. टीच्या रॅकवरून तिघा मित्रांचा दिवसभराचा 'शिरपूर ते पुणे' हा प्रवास पाहत पाहत सायंकाळपर्यंत पुण्यात पोहोचलो. रात्री आम्ही तिघी बॅगांनी स्वराजच्या आत्यांकडे मुक्काम केला. त्यावेळी आम्हाला आमची चौथी मैत्रीण म्हणजेच स्वराजचा आतेभाऊ सौरीशची बॅग भेटली. एकमेकांचा परिचय करून आम्ही रात्रभर एका उबदार खोलीत एकत्र पहुडलो. दिवसभराच्या प्रवासाने थकलेले स्वराज व त्याचे मित्र बाहेर केव्हाच झोपी गेले होते.

१ जून रोजी सकाळी ९.३० वाजता स्वराजने माझ्यातून त्याचे मोजे काढले नंतर बूट घालून प्रवासासाठी तयार झाला. मी पहिल्यांदाच पुणे शहर पाहत होती. सिटी बसचा प्रवास करत स्वराज आणि त्याचे मित्र पुण्यात एके ठिकाणी उतरले. समोर सदाशिव पेठ असे एके ठिकाणी लिहिलेले स्वराजने वाचले. थोडे अंतर चालल्यावर एका प्रशस्त आणि बहुमजली इमारतीच्या आवारात मुलांनी आमच्यासह प्रवेश केला. हीच ती प्रसिद्ध 'ज्ञान प्रबोधिनी'ची इमारत हे तेव्हा मला समजले. त्यावेळी बरेच



अनोळखी मुलं त्याठिकाणी फॉर्म भरत होते. ते सहलीचे संमतीपत्रक असावे असा मी अंदाज बांधला. आम्हा सर्वांना पोर्चमध्ये ठेवून सर्व मुले एका मोठ्या हॉलमध्ये जमली. तेथे साधारणत: पंधरा मिनिटानंतर सर्व मुले बाहेर आली. त्यावेळी मुलांच्या चर्चेतून त्यांना गिरिभ्रमणाविषयी विविध सूचना त्या हॉलमध्ये देण्यात आल्या असाव्यात. त्यानंतर हॉलमधून गिरिभ्रमणाचे प्रमुख म्हणून ज्यांच्यावर जबाबदारी होती, असे दोन तरुण बाहेर आले. त्यांनी मुलांना अमेय दादा व नितीश दादा असा थोडक्यात परिचय करून दिला. त्यानंतर मुलांचा आपापसात परिचय व्हावा म्हणून एक मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आला. त्यानंतर कच्चा व पक्का शिधा वाटण्यात आला. या नवीन वजनाच्या कल्पनेनेच माझ्या अंगावर काटा आला कारण स्वराजने मला आधीच खूप ठासून भरले होते. शेवटी माझ्यातलं काही सामान बाजूला काढून त्यात ही नवी भर केली गेली. त्यानंतर मुले जेवायला गेली. जेवणानंतर आमचे गिरिभ्रणच्या दिशेने 'ज्ञान प्रबोधिनी' बाहेर पाऊल पडले.

मी स्वराजच्या पाठीवर बसून पुणे स्टेशन गाठले. सर्व मुले आपापल्या बॅगा त्यांच्या पाठीवर घेऊन चालत होती. काही मुले आमचे ओझे सहज वाहून नेत होते, तर काही मुले अवघडून चालत होते. आम्ही सर्वजण 'पुणे-इंदूर' या रेल्वेच्या जनरल बोगीत जाऊन बसलो. माझ्यासहित सर्व बॅगांना डब्यात रॅकवर ठेवण्यात आले. तेथे काही पुणेरी बॅगांशी माझी ओळख झाली. 'एन. जी. राजीवडेकर' असे नाव असलेल्या बॅगा इतर बॅगांशी थोड्या शिष्टपणे वागत होत्या. परंतु नंतर मात्र त्यांनी आम्हा

गाव सुनं-सुनं सारं, सुनी वाटे माझी माडी। तुझ्यावर खेळ सारा, कशी जोडू बैलगाडी।।

। **जरूर पाहा... केम्प्टी धबधबा** - उंची ४,५०० फूट, मसुरी (राज्य-उत्तरांचल)।

छात्र प्रबोधन मासिकाचे सभासद व्हा व त्यातील उपक्रम, स्पर्धेत भाग घ्या - छा. प्र., ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१०६

खान्देशी बॅगांशी चांगले जुळवून घेतले. मुलांच्या गप्पांमध्ये कल्याण स्टेशन कधी आले तेसुद्धा समजले नाही. कल्याणहून बसने मुरबाड व तेथून बसने देहरी या गावी रात्री पोहोचलो. मला असे वाटले, की आता रात्रभर आराम आणि सकाळी प्रवास असा कार्यक्रम असावा. माझ्यासह सर्व बॅगा एका दुकानासमोरील ओट्यावर आरामात पडून होत्या. अचानक अमेय दादाचा आवाज आला, ''चला! मुलांनो आज रात्रीच आपण गड चढणार आहोत. आपापल्या बॅगा पाठीवर घेऊन गटाप्रमाणे चालायला लागा.''

झाले! मला पाठीवर घेऊन स्वराजने रात्री सव्वादहा वाजता चालायला सुरुवात केली. पाच मुलांचा एक गट अशा गटागटाने मुलं चालायला लागली. किर्र अंधारात एका किल्ल्याची चढण चढायला मुलांनी सुरुवात केली. 'गोरखगड' असे त्या किल्ल्याचे नाव मला मुलांच्या गप्पांमधून समजले. स्वराजला चांगलाच घाम फुटला होता. उभ्या आयुष्यात अशी रात्रीची चढाई अनेक मुले पहिल्यांदाच करीत होती. मधूनमधून थांबा! हळू चला!, सांभाळून रे!, पडला का रे?, दादा थांब ना! असे मुलांचे उद्‌गार ऐकू येत होते. एक तासाची खडी चढण चढल्यानंतर अनेक मुलांचे घसे तहानेने कोरडे पडले होते. अनेकांच्या जवळचे पाणीदेखील संपले होते, म्हणून एका देवळात आम्ही सर्वजण थांबलो. आम्हालादेखील मुलांच्या खांदयावरून खाली उतरल्यामुळे आनंद वाटला. थोडा वेळ आराम करून पुन्हा काही वेळ चढाई केली. आता सर्वच बालगोपाल खूप थकले होते. त्यामुळे एक मोकळी सपाट जागा पाहून सर्वांनी रात्र तेथेच काढायची असे ठरविले. माझ्यातून स्वराजने अंथरूण, पांघरूण काढले व मला उशाशी घेतले. आम्ही सर्व बॅगा मात्र रात्रभर मुलांवर पहारा देत जाग्या होतो, मुलांची जबाबदारी होती ना आमच्यावर! मुले झोपली तेव्हा रात्रीचे २.३० वाजले होते.

ट्रेकचा दुसरा दिवस उजाडला, मुलांनी प्रात:र्विधी उरकून गडावर जाण्याचा निर्णय घेतला; परंतु मुलांनी आम्हाला सोबत घेतले नाही. माझ्यासकट सर्व बॅगांना एका दोरीत बांधून गुहेत ठेवले व मुले किल्ल्यावर गेली. साधारणत: एका तासाने मुले परत आली, आमच्यातून पुऱ्या काढून, पाणी पिऊन ताजेतवाने होऊन पुढील प्रवासाकडे निघाली. आम्हा बॅगांना गोरखगडावर जाता आले नाही याची खंत मनात असल्यामुळे, मुलांच्या गप्पा मी अधिक कान देऊन ऐकू लागलो. त्यावेळी मला कळले की गडावर पुरातन 'गोरखनाथ' मंदिर त्याचप्रमाणे 'मामा-भाचा' शिल्प इत्यादी प्रेक्षणीय गोष्टी होत्या. आता मुलांचे पुढचे ध्येय होते 'सिद्धगड!'

खड्या उतारांवर मुले उतरू लागली. स्वराजचा पाय घसरला की मलादेखील झटका बसत होता. मोकाट भणाणणारा रानवारा मनाला आनंद देत होता. मुले बेधडक करवंदीच्या जाळ्यांमधून जाऊन करवंदे खात होती, आम्हाला मात्र करवंदीचे काटे चांगलेच टोचत होते. रस्त्यात मुलांना एक पाण्याचा हातपंप दिसला तेथे मुलांनी आपला थकवा घालवला. ताजेतवाने होऊन मुले सिद्धगडवाडीच्या दिशेने निघाली. वाटेत ५-६ घरांचा सिद्धगडपाडा लागला. सायंकाळी आम्ही सिद्धगडवाडीला पोहोचलो. माझ्यासह सर्व बॅगांना एका छोट्या घरात ठेवण्यात आले. बाहेर पावसाचा आवाज ऐकू येत होता, मुलांनी बहुतेक स्थानिक जेवणाचा आनंद घेतला असावा. बाहेर शांतता पसरली. मुले झोपली असावीत असा अंदाज करून आम्ही सर्व बॅगादेखील गाढ झोपी गेलो. गिरिभ्रमणाचा दुसरा दिवस अशाप्रकारे संपला.

३ जूनची सकाळ उजाडली. बाहेर पाऊस पडतच होता, मुलांनी चहा, नाश्ता घेऊन पुन्हा एकदा आम्हाला खालीच ठेवून गडावर जायचा निर्णय घेतला. आम्हाला खूप वाईट वाटले. आम्ही तेथेच खोलीत एकमेकांशी गप्पा मारत बसलो. अडीच तासाने साधारणत: मुले परत आली. त्यांनी आम्हाला पाठीवर घेतले आणि प्रवासाचा पुढील टप्पा सुरू झाला. मुलं भीमाशंकरच्या दिशेने निघाली होती, सिद्धगडावर काय असेल याची उत्सुकता मुलांच्या गप्पांमधून शमली. सिद्धगडावरून सह्याद्रीच्या कड्याकपाऱ्यांचे नयनरम्य दृश्य मुलांनी अनुभवले. त्याचप्रमाणे गडावर दोन पाण्याचे टाकेदेखील असल्याचे मुले एकमेकांना सांगत होती. मी मनानेच गडावर एक फेरी मारून आली. गप्पा करत, गाणे म्हणत, थट्टा-विनोद करत मुले पाऊलवाटेने पुढे जात होती. मध्येच वाट

किती फिरवू नांगर, माती दगड झालीया। चार थेंब पाण्याची रं, तिला ओढ लागलीया।।

। **जरूर पाहा... तीर्थगड धबधबा** - उंची २९९ फूट, जि. बस्तर (राज्य-छत्तीसगड)।

सहभागी व्हा, अनुभव घ्या - सुट्टीमधील जोडीकार्ये - छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे ☎ २४२०७१७४

चुकल्यामुळे आम्हाला एक खडी चढण पार करावी लागली. आता आम्ही पठारावर आलो होतो. वाट सोपी, पण अभयारण्यातून जात होती. तशात अंधारही पडू लागला होता. मुलांनी आमच्यातून बॅटऱ्या काढल्या व वाट चालू लागले, गडद अंधारात एक झाड अचानक चमचमू लागले. एकाच झाडावर बसलेल्या हजारो काजव्यांमुळे निसर्गाचा हा आविष्कार आम्हाला बघायला मिळाला. मुले तर आनंदाने नाचू लागली होती.

४ जून, आज ट्रेकचा शेवटचा दिवस. मुलं खूप आनंदात दिसत होती. आज घरी जायला मिळेल, हे एक कारण त्यामागे असावे. आमच्यातून भेळ व मॅगीचे सामान काढण्यात आले त्यामुळे आमचेही वजन बरेच कमी झालेले होते. भरपेट नाश्ता केल्यावर एका जीपमध्ये बसून भीमाशंकरला जायचे ठरले. माझ्यासह सर्व बॅगांना गाडीच्या टपावरील कॅरीयरवर ठेवले. आम्ही पडू नये म्हणून आम्हाला दोरीने बांधण्यात आले. भीमाशंकरच्या डोंगराळ आणि हिरवाईने नटलेल्या प्रदेशातून असा उघड्यावर प्रवास करताना खूप आनंद मिळाला. एकाच जीपमध्ये सर्वच मुलांना एकावेळी नेल्यामुळे मुलांनादेखील सर्कशीचा आनंद मिळाला असावा. आम्हाला रॅकमध्ये ठेवून मुले भीमाशंकरच्या मंदिरात दर्शनाला गेली. परत आल्यावर आमच्यातून दही काढून त्याची लस्सी बनवून मुले पोटभर प्यायली. अमेय दादाने पुण्याला परतण्याचे संकेत दिले. 'भीमाशंकर-पुणे' ही बस पकडून आम्ही सर्व बॅगा पुन्हा एकदा रॅकवर स्थानापन्न झालो. वाटेत डिंबे धरण, घोडेगाव, मंचर, चाकण इ. ठिकाणे लागली. गाडी पुण्यात पोहोचली त्यावेळी मुसळधार पाऊस सुरू झाला होता. आम्ही सर्व बॅगा पुण्यात आल्यावर मुलांच्या पाठीवर बसलो. पावसात भिजतच बसने 'ज्ञान प्रबोधिनी' गाठले. अशाप्रकारे आमच्यासह मुलांची ही गिरिभ्रमण सहल संपली.

या निमित्ताने मला पुण्याचा प्रवास घडला. 'ज्ञान प्रबोधिनी'चे दर्शन झाले. श्रीयुत महेन्द्र सेठिया, अमेय आमशेकर, नितिश दादा, विनायक दादा यांसारख्या व्यक्तींचे सान्निध्य मिळाले. महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या बॅगांशी माझा परिचय झाला. कणखर आणि राकट असलेल्या महाराष्ट्राच्या डोंगरदऱ्यात स्वराजच्या

पाठीवर बसून भटकायला मिळाले. त्याच्या शारीरिक व मानसिक शक्तीचा कस लागलेला, या सहलीत मला अनुभवण्यास मिळाला. या माझ्या सहलीस कारणीभूत ठरलेल्या सर्वांचे आभार कसे मानावे ते मला कळत नाही.

या गिरिभ्रमणाच्या आठवणी मला आयुष्यभर सोबत राहतील याबाबत मला शंका नाही.

❖ ❖

- चि. स्वराज पाटील
४०४, यशोदिप क्लिनिक, बरावद,
ता. शिंदखेडा, जि. धुळे- ४२५४०३

हसा... हसा....

विनूने धापा टाक टाकतच घरात प्रवेश केला. सोफ्यावर पेपर वाचत बसलेल्या त्याच्या बाबांनी त्याला विचारले, 'का रे! काय झाले? इतकी धाप लागायचं काय कारण? कोणी मारलं वगैरे का?'

त्यावर विनू म्हणाला, 'छे शाळेत सांगितल्याप्रमाणे एक सत्कृत्य करून आलो. एका आंधळ्याला रस्ता ओलांडून दिला.'

'शाब्बास ! पण मग त्यात एवढा दम लागायचे कारण काय?' बाबांनी प्रश्नार्थक मुद्रेने विचारले. थोडासा स्वस्थ झालेला विनू म्हणाला, 'पण त्या आंधळ्याला रस्ता ओलांडायचा नव्हता नं...'

आता हळूच बरस, कुठे होता लपलास। राजा तुझ्या येण्यामुळं, पोटी पडणार घास ।।

। जरूर पाहा... हुंडरू धबधबा - उंची ३२२ फूट, रांची (राज्य-झारखंड)।

नागरीवस्त्यांमधील किशोरींसाठी उपक्रम - नागरीवस्ती अभ्यासगट, ज्ञान प्रबोधिनी, पुणे - हर्षाताई ☎ ९३२५२७२३३७

कोणत्याही देशाची उन्नती ही तेथील भौतिक संपत्तीवर होत नसून, ज्ञान, विवेक, शौर्य, धैर्य, उद्योगीपणा, संयम, चिकाटी, राष्ट्रप्रेम, त्याग, नि:स्पृहता अशा सद्‌गुणांनी युक्त नागरिकांमुळे होत असते. अशी सद्‌गुणांनीयुक्त माणसे शिवाजी महाराजांनी निर्माण केली, म्हणून हिंदवी स्वराज्य निर्माण झाले.

'छात्र प्रबोधन' हे मासिक छात्रांवर ही मूल्ये रूजविण्याचे काम गेली २१ वर्षे सातत्याने करत आहे. शिक्षक व पालकांनी किमान 'छात्र प्रबोधन' हे मासिक वाचण्याची सवय मुलांना लावली तर चांगले साहित्य वाचण्याची आवड नकळतच त्यांच्यात रूजेल. चांगले वाचन केल्यामुळे छात्रांवर नकळत चांगले संस्कार होतात. मासिकातील सर्वसमावेशक आशयामुळे त्यांच्यामध्ये सामाजिक जाणीवांचा विकास होतो. इतरांप्रती सहसंवेदना वाढीस लागते. उत्तम विद्यार्थी घडवण्याच्या या कामात छात्र प्रबोधनला मनापासून शुभेच्छा!

– नीता देवकर, पुणे

✻

शिक्षकांच्या नजरेतून 'छात्र प्रबोधन'

छात्र प्रबोधन
२० वर्षांची वाटचाल

'छात्र प्रबोधन'कडून राबविण्यात येणारे उपक्रम हे मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात. समाजामधील संवाद वाढविण्यासाठी, मुलांच्या संवेदनशीलतेच्या वृद्धीसाठी तसेच विचारांची देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीने 'छात्र प्रबोधन'चे कार्य मोलाचे आहे. फक्त शहरातीलच नव्हे; तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही यामध्ये सहभागी करून घेतले जाते. विविध उपक्रमांद्वारे मुलांना 'स्वनिर्मिती'चा आनंद मिळत आहे. विद्यार्थ्यांसाठी मोलाचे काम करणाऱ्या छात्र प्रबोधनचे कौतुक व पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा!

– वसुधा शेंडे, पुणे

✻

'छात्र प्रबोधन' म्हणजे कुमार घडविण्याची प्रयोगशाळाच आहे. 'ज्ञान प्रबोधिनी' शाळेत प्रवेश मिळाला नाही याची उणीव बरीचशी मुलं तुमच्या उपक्रमामध्ये भाग घेऊन काही अंशी भरून काढतात. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वाची जाणीव निर्माण करण्याचे काम छात्र प्रबोधन करते. मुलांवर योग्य संस्कार करणे, त्यांच्या बुद्धीला चालना देण्याचे काम मासिकाद्वारे होते. मासिकातील भाषेची काठिण्य पातळी थोडी कमी करून त्यातील लालित्य अधिक वाढले तर मुलांना अंक अधिक जवळचा वाटेल.

– संजय वझरेकर, मु. पो. कर्जत, जि. रायगड

✻

---

(१) ४'×१' मापाच्या चार फळ्यांची एक चौकट प्रथम अशी तयार करा की प्रत्येक बाजू ५' या मापाची होईल. चौकटीच्या आतील भागात ३×१' या मापाच्या तीन फळ्या बसविता येतील.

(२) वरच्या रांगेतील ५,७ आणि २ या संख्या असलेल्या चकत्यांची जोडी दूर करा. राहिलेल्या चकत्यांवरील संख्यांची बेरीज १४ होईल.

(पान २६ वरील कोड्याचे उत्तर)

(३)



(४)



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९३५, १ ऑगस्ट २०१३ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे –२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे – ३० येथून प्रसिद्ध केले.

सोडवा हे मोरपिशी कोडे...

खाली काही कवी व त्यांच्या काव्यपंक्ती दिल्या आहेत. त्या काव्यपंक्ती कोणत्या कवीच्या आहेत ते ओळखा पाहू. खाली दिलेल्या पद्यपंक्ती ज्या कवीच्या कवितेतील आहेत ती कविता पूर्ण मिळवा. अशा किमान तीन 'पूर्ण कविता' मिळवून 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा.

कवी -

१. स्वांतत्र्यवीर सावरकर
२. कुसुमाग्रज
३. साने गुरुजी
४. ग. दि. माडगुळकर
५. वसंत बापट
६. सुरेश भट
७. मंगेश पाडगावकर
८. रवींद्र भट
९. इक्बाल
१०. प्रदीप

- गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार
- बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो
- जयोस्तुते जयोस्तुते श्रीमहन्मंगले शिवास्पदे शुभदे
- तु नव्या जगाची भाषा जय जय भारत देशा
- माणुसकीच्या शत्रुसंगे युध्द आमुचे सुरु
- वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदेमातरम्
- सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा
- सदैव सैनिका पुढेच जायचे न मागुती तुवा कधी फिरायचे
- ए मेरे वतन के लोंगों, जरा आँखो मे भरलो पानी
- उष:काल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली

सौर श्रावण, शके १९३५/ ऑगस्ट २०१३, पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
पंजीकरण क्रमांक (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2 / RNP / PNW/M / 94 / 2012 - 2014, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**

सौर दिनदर्शिका
शके १९३५

	ऑगस्ट २०१३	श्रावण भाद्रपद
गु.	1	१०
शु.	2	११
श	3	१२
र.	4	१३
सो.	5	१४
मं.	6	१५
बु.	7	१६
गु.	8	१७
शु.	9	१८
श.	10	१९
र.	11	२०
सो.	12	२१
मं.	13	२२
बु.	14	२३
गु.	15	२४
शु.	16	२५
श.	17	२६
र.	18	२७
सो.	19	२८
मं.	20	२९
बु.	21	३०
गु.	22	३१
शु.	23	भा. १
श.	24	२
र.	25	३
सो.	26	४
मं.	27	५
बु.	28	६
गु.	29	७
शु.	30	८
श.	31	९



इंद्रधनुषी आविष्कार...
श्रावणातल्या ऊन-पावसाच्या खेळात आकाशातील इंद्रधनुषी आविष्कार जणू फुलांच्या रूपाने धरतीवर उतरतात. हिरवाईवर उगवलेली पिवळी सोनटिकली, पांढरे मिटलेले अन् उमललेले 'एरिओकोलॉन'चे छोटे गेंद आणि जांभळ्या रंगाचा, मिकीमाऊसच्या चेहऱ्यासारखा दिसणारा 'स्मिथिया' आपल्या कॅमेऱ्यात टिपलाय **डॉ. राहुल मुंगीकर** यांनी...

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९

या अंकाची किंमत : ₹ १५/-
वार्षिक वर्गणी : ₹ १८०/-
प्रकाशन दिनांक :
सौर १० श्रावण, शके १९३५
१ ऑगस्ट २०१३

www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -